॥ श्री ॥

१२ ब्रह्मानन्दे आत्मानन्द:

- अकराव्या प्रकरणांत विवेक्यांस योगानंदाची कशी प्राप्ति होते तें सांगितलें. पण सर्वच जिज्ञासु विवेकी नसतात. यास्तव मंद साधकांवर अनुग्रह करण्याच्या इच्छेनें ग्रंथकार या बाराव्या प्रकरणास आरंभ करीत आहेत. परंतु मंद जिज्ञासूंस ब्रह्मानंदाचा कसा अनुभव येईल, हा एक पुढें येणारा प्रश्न आहे. यास्तव प्रथमत: त्या प्रश्नाचाच अनुवाद करितात:-

नन्वेवं वासनानन्दाद्ब्रह्मानन्दादपीतरम् ॥
वेत्तु योगी निजानन्दं मूढस्यात्रास्ति का गति: ॥१

अन्वयार्थ - [ननु एवं योगी वासनानंदात् ब्रह्मानंदात् अपि इतरं निजानन्दं वेत्तु] ह्याप्रमाणें योगी वासनानन्द व ब्रह्मानन्द यांहून भिन्न जो निजानन्द त्यास जाणो. [अत्र मूढस्य का गति: अस्ति] पण येथें मूढाची काय दशा होणार ?

प्रकाश:- निजून उठल्यावर आनंदाच्या संस्कारामुळें कांहीं काल अनुभवास येणाऱ्या सुखास वासनानंद, व खुद्द निद्रासमयीं भासणाऱ्या आनंदास ब्रह्मानंद असें म्हटलें आहे. निजानंदाचा अधिक अनुभव कसा व केव्हां येऊं लागतो, हेंहि गेल्या प्रकरणाच्या ९८ व्या श्लोकांत सांगितलें आहे. अर्थात् विवेकी पुरुषास प्राप्त होणारा निजानंद पूर्वोक्त दोन्ही आनंदांहून भिन्न आहे, व तो चित्ताच्या ऐकाग्र्यामुळेंच प्राप्त होणें शक्य आहे, म्हणून योगी पुरुषास जरी तो संपादन करितां आला तरी सामान्य जनांची काय वाट ? त्यांनीं कसें कृतार्थ व्हावें ? ॥१॥

-पूर्वोक्त प्रश्न शिष्यानें गुरूस केला आहे व त्याचें गुरु उत्तर देत आहेत:--

धर्माधर्मवशादेष जायतां म्रियतामपि ।
पुन: पुनर्देहलक्षै: किं नो दाक्षिण्यतो वद ॥२

अन्वयार्थ - [एष: धर्माधर्मवशात् पुन: पुन: देहलक्षै: जायतां म्रियतां अपि] हा धर्म व अधर्म यांच्या अधीन झाल्यामुळें वारंवार लक्षावधि देह घेऊन जन्मो व मरो. [न: दाक्षिण्यत: किं वद] आमच्या दाक्षिण्याच्या योगानें त्याचें काय होणार ! सांग.

प्रकाश:- इतका जो मूढ असेल त्यानें पुण्य व पाप यांच्या अधीन होऊन या अनादि संसारामध्यें असंख्य वेळां जन्मास यावें व अनंत वेळां खुशाल मरावें. तेथें आमचा कांहीं इलाज नाहीं. अशा पुरुषाचा विद्येमध्यें अधिकारच नसल्यामुळें आम्ही त्याच्याविषयीं कितीहि जरी दया बाळगली, तरी त्याचा काय उपयोग होणार ? किंवा आम्ही सर्व अज्ञांचा उद्धार करणार अशी कितीहि जरी प्रौढी मिरवली तरी त्यापासून कोणता लाभ होणार ? ॥२॥- आतां - शिष्य पुन: गुरूंची प्रार्थना करितो; व गुरूहि त्यास प्रश्न करितात --

अस्ति वोनुजिघृक्षुत्वाद्दाक्षिण्येन प्रयोजनम् ।
तर्हि ब्रूहि स मूढ: किं जिज्ञासुर्वा पराङ्मुख: ॥३

अन्वयार्थ - [व: अनुजिघृक्षुत्वात् दाक्षिण्येन प्रयोजनं अस्ति] शिष्य-तुम्हांस अनुग्रह करण्याची इच्छा असल्यामुळें (तुमच्या) दाक्षिण्याचें (आम्हांस) फल मिळतें. [तर्हि ब्रूहि स: मूढ: किं जिज्ञासु: वा पराङ्मुख:] गुरु-असें जर असेल तर सांग, तो मूढ जिज्ञासु आहे कीं पराङ्मुख आहे ?

प्रकाश:- या श्लोकाच्या पूर्वार्धांत शिष्यानें गुरूस उपाय सांगण्याकरितां आग्रह केला आहे. तो म्हणतो, महाराज, सर्व प्राणिमात्रांवर अनुग्रह करण्याची आपली इच्छा असते, त्यामुळें आपल्या उपदेशानें अवश्य लाभ होईल. हें शिष्याचें वचन ऐकून गुरु म्हणतात, असें जर तुला निश्चयपूर्वक वाटत असेल, तर ज्या मूढाविषयीं तूं उपाय विचारीत आहेत, तो जिज्ञासु आहे, कीं शुद्ध प्राकृत आहे, तें अगोदर सांग; म्हणजे त्याप्रमाणें उपायाची योजना करूं, या ठिकाणीं जिज्ञासु या शब्दाचा अर्थ रागी, विषयी इत्यादि समजावा. ॥३॥

-'तो रागी-विषयासक्त असेल तर त्याच्या आसक्तीच्या अनुसार त्याला कर्म किंवा उपासना सांगावी,' असें सांगतात -

उपास्तिं कर्म वा ब्रूयाद्विमुखाय यथोचितम् ।
मन्दप्रज्ञं तु जिज्ञासुमात्मानन्देन बोधयेत् ॥४

अन्वयार्थ - [विमुखाय कर्म उपास्तिं वा यथोचितं ब्रूयात्-] तो जर तत्त्वज्ञानाविमुख-बहिर्मुख असेल तर त्याला कर्म किंवा उपासना यांतील जें उचित असेल तें सांगावें. तो ब्रह्मलोकाची इच्छा करणारा असेल तर त्याला उपासना सांगावी व स्वर्गादिकांची इच्छा करणारा असेल तर कर्म सांगावें. [मंदप्रज्ञं जिज्ञासुं तु आत्मानंदेन बोधयेत्-] पण मंदबुद्धि जिज्ञासूला आत्मानन्दाच्या योगानें बोध करावा.

प्रकाश:- तत्त्वज्ञानापासून जो विन्मुख असतो म्हणजे त्याच्याकडे जो ढुंकूनहि पाहत नाहीं, त्यास बहिर्मुख किंवा विमुख म्हणतात. अशा सामान्य मनुष्यास कर्म किंवा उपासना करण्याविषयीं सांगावें. तो जर ब्रह्मलोकादिकांची इच्छा करीत असेल, तर त्यास उपासना सांगावी व स्वर्ग, पितृलोक, मनुष्यलोक इत्यादि लोकांची जर त्यास इच्छा असली, तर श्रौतस्मार्त कर्म सांगावें. बरें, तो जर मंदबुद्धि असूनहि तत्त्व जाणण्याची इच्छा करीत असला, तर त्यास आत्मानंदाचा उपदेश करावा. तो कसा करावा, हें पुढें सांगितलें आहे. या श्लोकांतील विमुख या शब्दाचा मुख्य अर्थ वर सांगितलाच आहे. पण सर्वच विमुख पुरुष कर्माचे किंवा उपासनेचे अधिकारी असतात असें समजूं नये. कारण त्यांतील कित्येक नास्तिकहि असतात; यास्तव श्रद्धालु व परलोकाची इच्छा करणारे पण तत्त्वज्ञानापासून विन्मुख व विषयी अशा पुरुषांकरितां कर्म व उपासना यांचा उपदेश करावा. ॥४॥

- पूर्वीं याप्रमाणें कोणीं कोणाला बोध केला तें आतां सांगतात -

बोधयामास मैत्रेयीं याज्ञवल्क्यो निजप्रियाम् ।
न वा अरे पत्युरर्थे पतिः प्रिय इतीरयन् ॥५

अन्वयार्थ - [न वा अरे पत्युः अर्थे पतिः प्रियः इति ईरयन् याज्ञवल्क्यः-] 'पत्नीला पतीच्या कामाकरितां पति प्रिय होत नाहीं.'. असें सांगणाऱ्या याज्ञवल्क्यांनीं [निजप्रियां मैत्रेयीं बोधयामास-] आपल्या प्रिय मैत्रेयीला बोध केला आहे.

प्रकाश:- बृहदारण्यकाच्या तिसऱ्या व सहाव्या अध्यायांत हा प्रसंग आहे. याज्ञवल्क्य मुनि शुक्ल यजुर्वेदाच्या वाजनसेयी शाखेचे प्रवर्तक आहेत. त्यांनीं आपल्या अति प्रिय भार्येस प्रस्तुत उपदेश केला. याचें पुढें अधिक स्पष्टीकरण होईल. ॥५॥

-आत्मा परम प्रेमाचें स्थान आहे म्हणून परमानंदरूप आहे, असें सिद्ध करण्याच्या इच्छेनें प्रथम परप्रेमास्पदत्व या हेतूच्या समर्थनासाठीं वरील वाक्य उपलक्षणार्थ मानून त्या प्रकरणांतील सर्व वाक्यांचें तात्पर्य सांगतात -

पतिर्जाया पुत्रवित्ते पशुब्राह्मणबाहुजाः ।
लोका देवा वेदभूते सर्वं चात्मार्थतः प्रियम् ॥६

अन्वयार्थ - [पतिः, जाया, पुत्रवित्ते, **पशुब्राह्मणबाहुजाः, लोकाः, देवाः, वेदभूते, च सर्वं आत्मार्थतः प्रियं अस्ति-] पति, पत्नी, पुत्र, द्रव्य, पशु, ब्राह्मण, क्षत्रिय, लोक, देव, वेद, भूतें व इतर**

सर्व प्रत्येकास आत्म्याकरितां- स्वत:साठीं प्रिय असतात.

प्रकाश:- या जगांतील सर्व पदार्थ प्राण्यास प्रिय असतात, हें खरें; पण ते भोग्य पदार्थ त्या भोग्य पदार्थाकरिता प्रिय वाटत नसून भोक्ता जो आत्मा त्याच्याकरितां प्रिय वाटतात. ॥६॥

- पूर्वोक्त 'न वा अरे पत्यु:' या वाक्याचा तात्पयार्थ-

पत्याविच्छा यदा पत्न्यास्तदा प्रीतिं करोति सा।
क्षुदनुष्ठानरोगाद्यैस्तदा नेच्छति तत्पति: ॥७

अन्वयार्थ - [यदा पत्न्या: पत्यौ इच्छा भवति तदा सा प्रीतिं करोति-] ज्या वेळीं पत्नीला पतीविषयीं इच्छा होते, त्या वेळीं ती त्याच्यावर प्रीति करिते. [यदा तत्पति: क्षुदनुष्ठानरोगाद्यै: युक्त: भवति तदातं नेच्छति-] जेव्हां तिचा पति क्षुधा, अनुष्ठान, रोग इत्यादिकांनीं-इच्छेच्या अभावाला कारण होणाऱ्या निमित्तांनीं युक्त असतो, तेव्हां ती त्याच्या इच्छा करीत नाहीं.

प्रकाश:- क्षुधा, रोग इत्यादि इच्छाविघातक पीडांनीं जेव्हां पति पीडित होतो, तेव्हां पत्नी त्याची इच्छा करीत नाहीं. दरिद्री, रोगी, वृद्ध इत्यादि पतीची पत्नीकडून कशी संभावना होत असते, हें लोकप्रसिद्ध आहेच. ॥७॥

- यावरून असें ठरतें -

न पत्युरर्थे सा प्रीति: स्वार्थ एव करोति ताम् ।
पतिश्चात्मन एवार्थे न जायार्थे कदाचन ॥८

अन्वयार्थ - [सा प्रीति: पत्यु: अर्थे न-] ती प्रीति पतीकरितां नव्हे, [किंतु तां स्वार्थे एव करोति-] तर ती आपल्याकरितांच करिते. [पति: च आत्मन: एव अर्थे-] तसाच पतीहि आपल्या करितांच पत्नीवर प्रीति करितो,[न कदाचन जायार्थे करोति-] पत्नीकरितां कधींहि करीत नाहीं.

प्रकाश:- पति पत्नीवर जी प्रीति करितो, किंवा पत्नी पतीवर करिते, ती आपल्याकरितां होय, दुसऱ्याकरितां नव्हे. आतां दुसऱ्याकरितां ही माझी प्रीति आहे, असें जें लोक म्हणत असतात, तो केवळ व्यवहार आहे, एवढेंच आम्ही म्हणतों. ॥८॥

- 'जेव्हां एकेकाच्याच कामनेनें प्रवृत्ति होते तेव्हां त्याची ती प्रीति स्वार्थी असो; पण जेव्हां पति व पत्नी यांना एकाच वेळीं सुखेच्छा होऊन त्यांची प्रवृत्ति होते तेव्हां ती प्रीति उभयार्थ असते असें म्हटलें पाहिजे !' उत्तर --

अन्योन्यप्रेरणेऽप्येवं स्वेच्छयैव प्रवर्तनम् ॥९

अन्वयार्थ - [अन्योन्यप्रेरणे अपि एवं स्वेच्छया एव प्रवर्तनम्-] तीं एकमेकांना जेव्हां प्रेरणा करितात तेव्हांहि आपापली इच्छा पूर्ण करण्यासाठींच त्यांची प्रवृत्ति होते.

प्रकाश:- जरी एकाद्या कामांत दोघांचीहि प्रवृत्ति एकमेकांच्या प्रेरणेनें होतेसें वाटलें, तरी त्याचें स्वेच्छा हेंच बलवान कारण होय. कारण आपली इच्छा नसल्यास कोणी कितीहि जरी प्रेरणा केली, तरी आपण तें काम करीत नाहीं. भिडेमुळें एकाद्या कृत्यांत प्रवृत्त होणें, हेंहि सूक्ष्मदृष्ट्या पाहिल्यास स्वेच्छेचेंच कार्य आहे, असा निश्चय होतो. ॥९॥

-स्वेच्छेनें प्रवृति होते, हेंच उदाहरण देऊन स्पष्ट करितात --

श्मश्रुकंटकवेधेन बाले रुदति तत्पिता ।
चुंबत्येव न सा प्रीतिर्बालार्थे स्वार्थ एव सा ॥१०

अन्वयार्थ - [श्मश्रुकंटकवेधेन बाले रुदति सति अपि तत्पिता चुंबति एव-] दाढी-मिशीचे केंस खुपल्यामुळें बालक रडत असतांनाहि त्याचा पिता चुंबन घेतोच. [सा प्रीति: बालार्थे न-] ती प्रीति बालकाकरितां नव्हे, [किंतु सा स्वार्थे एव-] तर ती स्वत:करितांच होय.

प्रकाश:- लहान मुलाच्या गालास दाढीमिशीचे केंस कांट्यासारखे लागत असल्यामुळें कोणी पुरुष त्याचें चुंबन घेऊं लागल्यास तें रडूं लागतें. आपलें तोंड फिरवितें व हातांनीं त्याचें यथाशक्ति निवारण करितें. हें बहुतेक सर्व गृहस्थांस ठाऊक आहेच. वस्तुत: असा प्रकार जरी होत असला, तरी त्या मुलाच्या दु:खाकडे दुर्लक्ष्य करून चुंबन घेणारा त्याचें चुंबन घेतोच. पण तो हें कोणाच्या सुखाकरितां करितो ? मुलाच्या सुखाकरितांच हा सर्व खेळ आहे, असें कोणी तरी शहाणा म्हणेल का ? ॥१०॥

- स्त्री, पुत्र इत्यादि भोग्य पदार्थ सचेतन असल्यामुळें त्यांच्याविषयीं 'हें सर्व तीं कोणाकरितां करितात ?' असा संशय तरी येतो. पण जड पदार्थांविषयीं तसा संशय येणें शक्यच नाहीं, असें आतां वित्ताच्या दृष्टान्तानें दाखवितात -

निरिच्छमपि रत्नादिवित्तं यत्नेन पालयन् ।
प्रीतिं करोति स स्वार्थे वित्तार्थत्वं न शंकितम् ॥११

अन्वयार्थ - [निरिच्छं रत्नादिवित्तं अपि यत्नेन पालयन् स: पुरुष:-] जड असल्यामुळें निरिच्छ अशा रत्नादि धनाचेंहि प्रयत्नानें पालन करणारा पुरुष [स्वार्थे प्रीतिं करोति वित्तार्थत्वं न शंकितम्-] स्वत: करितांच त्याच्यावर प्रीति करितो, ती वित्ताकरितां आहे अशी शंकाहि येत नाहीं.

प्रकाश:- रत्नादि जड पदार्थांस इच्छा नसते हें तर उघड आहे. पण पुरुष त्यांचें मोठ्या प्रयत्नानें रक्षण करीत असतो व त्यांच्यावर त्याची मोठी प्रीतिहि असते. ते जर नष्ट झाले किंवा कोणी चोरून नेले तर हा त्यांच्याकरितां रड रड रडतो. पण ही एवढी प्रीति कोणाकरितां ? स्वत:करितां कीं त्या जड पदार्थांकरितां ? ॥११॥

- पशूच्या दृष्टान्तानें हीच गोष्ट सिद्ध करितात -

अनिच्छति बलीवर्दे विवाहयिषते बलात् ।
प्रीति: सा वणिगर्थैव बलीवर्दार्थता कुत: ॥१२

अन्वयार्थ - [बलीवर्दे अनिच्छति सति -] बैलाची इच्छा नसतांनाहि [बलात् विवाहयिषते-] मनुष्य त्याच्याकडून बलात्कारानें भार वाहविण्याची इच्छा करितो. [सा प्रीति: वणिगर्थे एव-] ती प्रीति वाण्याकरितांच होय. [तस्या बलीवर्दार्थता कुत:-] ती बैलाकरितां कोठून असणार ?

प्रकाश:- तरुण बैलाच्या पाठीवर जर कांहीं बोजा लादूं लागलें किंवा त्याला नांगरास अथवा गाडीस जोडूं लागलें तर तो मोठा नाखुष होतो असें दिसतें व त्यामुळें त्यास मारूनमुटकून वठणीस आणावा लागतो. पण ही जबरदस्ती कोणाकरितां ? त्या बिचाऱ्या बैलाकरितांच तर खचित नव्हे. अर्थात् ती या आपलपोट्या वाण्याकरितांच होय. गवळीलोक गाई दूध देत नसल्यास त्यास कसें कसें छळतात व तें कोणाकरितां ह्याचाहि येथें निर्देश करितां येण्यासारखा आहे. त्यांची इच्छा नसतांनाहि त्यांच्याकडून काम करून घेतात, यावरून हा सर्व प्रकार कोणाकरितां हें स्पष्ट आहे. ॥१२॥

- आतां क्रमप्राप्त ब्राह्मणाचा दृष्टान्त स्पष्ट करितात --

ब्राह्मण्यं मेऽस्ति पूज्योऽहमिति तुष्यति पूजया ।
अचेतनाया जातेर्नो संतुष्टि: पुंस एव सा ॥१३

अन्वयार्थ - [मे ब्राह्मण्यं आस्ति अहं पूज्य: इति पूजया तुष्यति-] मला ब्राह्मण्य आहे, त्यामुळें मी पूज्य आहें, असें म्हणून पूजेच्या योगानें प्राणी संतुष्ट होतो. [अचेतनाया: जाते: संतुष्टि: नो-] अचेतन अशी जो जाति तिची ही तुष्टि नव्हे [सा पुंस: एव-] अर्थात् ती पुरुषाचीच होय.

प्रकाश:- मी जातीचा ब्राह्मण आहें. तेव्हां मी सर्वांस पूज्य आहें. असें जातीचा अभिमान बाळगणारा जो असतो त्यास वाटत असतें आणि त्यामुळें कोणी जरासा सत्कार केला कीं तो मोठा संतुष्ट होतो. पण हा संतोष जड जातीस होत असतो असें कोणी तरी म्हणेल का ? ॥१३॥

-'न वा अरे क्षत्रस्य' या वाक्याचें तात्पर्य -

क्षत्रियोऽहं तेन राज्यं करोमीत्यत्र राजता ।
न जातेर्वैश्यजात्यादौ योजनायेदमीरितम् ॥१४

अन्वयार्थ - [अहं क्षत्रिय: अस्मि तेन राज्यं करोमि-] मी क्षत्रिय आहें म्हणून राज्य करितों. [इति अत्र राजता जाते: न] या ठिकाणीं राजता जातीची नव्हे [इदं वैश्यजात्यादौ योजनाय ईरितम्-] हें वैश्यजाती इत्यादिकांमध्ये योजून दाखविण्याकरितां सांगितलें आहे.

प्रकाश:- मी क्षत्रियजातिमान् असल्यामुळें राज्याचा उपभोग घेत आहें. या वाक्यांतील सुखोपभोग जातिमान् पुरुषासच होत असतो. जड जातीस कधींच होणें शक्य नाहीं, हें उघड आहे. ब्राह्मण जातीचें उदाहरण वर दिलें असतांना पुन: क्षत्रिय जातीचें उदाहरण दिलें आहे तें वैश्यादि सर्व जातींच्या ठिकाणीं अशीच योजना करावी, हें सुचविण्याकरितां आहे. ॥१४॥

-'न वा अरे लोकानां कामाय०' याचें तात्पर्य -

स्वर्गलोकब्रह्मलोकौ स्तां ममेत्यभिवांछनम् ।
लोकयोर्नोपकाराय स्वभोगायैव केवलम् ॥१५

अन्वयार्थ - [मम स्वर्गलोकब्रह्मलोकौ स्तां इति अभिवांच्छनं लोकयो: उपकारय न-] मला स्वर्गलोक व ब्रह्मलोक मिळावा, अशी जी दृढ इच्छा असते ती त्या लोकांच्या उपकाराकरितां नव्हे; तर [केवलं स्वभोगाय एव-] केवल आपल्या भोगाकरितांच होय.

प्रकाश:- मला स्वर्गप्राप्ति व्हावी; मी ब्रह्मलोकीं जावें; मला पितृलोकीं अखंड वास मिळावा; मी सूर्यलोकीं प्रवेश करावा; इत्यादिप्रकारें मनुष्य अनेक लोकांची इच्छा करीत असतो. पण ती इच्छा त्या त्या लोकांकरितां नसून केवल स्वत:च्या सुखोपभोगा-करितांच होय; यांत कांहीं शंका नाहीं. ॥१५॥

- त्याचप्रमाणें -

ईशविष्ण्वादयो देवा: पूज्यन्ते पापनष्टये ।
न तन्निष्पापदेवार्थं तत्तु स्वार्थं प्रयुज्यते ॥१६

अन्वयार्थ - [ईशविष्ण्वादय: देवा: पापनष्टये पूज्यन्ते-] शंकर, विष्णु इत्यादि देव पापाचा नाश होण्याकरितां पूजिले जातात, [तत् निष्पापदेवार्थे न-] पण तें पूजन निष्पाप जे देव त्यांच्याकरितां नव्हे. [किं तु तत् स्वार्थं प्रयुज्यते-] तर तें पूजन स्वत:करितांच केलें जातें.

प्रकाश:- मनुष्य देवादिकांची जी मनापासून उपासना करीत असतो, ती आपल्या पापाचा नाश व्हावा म्हणूनच होय. देव स्वत: निष्पाप असल्यामुळें त्याच्याकरिता नव्हे. अर्थात् त्या उपासनेचें फल साधकासच मिळणार व स्वत:करितांच तो तें करीत असतो, हें उघड आहे. ॥१६॥

- त्याचप्रमाणें -

ऋगादयो ह्यधीयन्ते दुर्ब्राह्मण्यानवाप्तये ।
न तत्प्रसक्तं वेदेषु मनुष्येषु प्रसज्जते ॥१७

अन्वयार्थ - [दुर्ब्राह्मण्यानवाप्तये ऋगादय: अधीयन्ते हि-] व्रात्यत्व प्राप्त होऊं नये म्हणून ऋग्वेदादि वेदांचें अध्ययन केलें जातें, हें उघड आहे. [तत् वेदेषु न प्रसक्तम्-] तें व्रात्यत्व वेदांमध्यें प्रसक्त होत नाहीं. [मनुष्येपु प्रसज्जते-] मनुष्यांमध्यें प्रसक्त होतें.

प्रकाश:- जो वेदाध्ययन करीत नाहीं तो व्रात्य होय. अशा ब्राह्मणासच दुष्ट ब्राह्मण म्हणतात. पण हें

दोषयुक्तत्व आपल्याकडे येऊं नये म्हणून ब्राह्मण लोक आपल्या शाखेचें अध्ययन करितात. पण हें निर्दोषत्व किंवा सदोषत्व वेदांच्या ठायीं कधीं तरी असूं शकेल का ? तें ब्राह्मणाच्या ठायीं असणार हें उघड आहे. अर्थात् ब्राह्मणांस स्वत:करितांच वेद प्रिय होत असतात. ॥१७॥

- तसेंच --

भूम्यादिपञ्चभूतानि स्थानतृट्पाकशोषणै: ।
हेतुभिश्चावकाशेन वाञ्छंत्येषां न हेतव: ॥१८

अन्वयार्थ - [सर्वे प्राणिन: स्थान-तृट्-पाकशोषणै: हेतुभि: च अवकाशेन भूम्यादिपंचभूतानि वाञ्छन्ति-] **सर्व प्राणी भूमीनें आपल्याला रहावयास स्थान द्यावें, जलानें तृषानिवृत्ति करावी, तेजानें पाक करावा, वायूनें आर्द्रता घालवावी, आकाशानें अवकाश द्यावा, या निमित्तांनीं पृथिव्यादि भूतांची अपेक्षा करितात.** [एषां हेतव: न-] **त्या पृथिव्यादि भूतांना स्थानादिकांच्या इच्छा नसतात. त्यामुळें तीं स्वत: त्यांसाठीं भूतांची अपेक्षा करीत नाहींत.**

प्रकाश:- आपल्याला राहावयास जागा पाहिजे म्हणून भूमीची गरज, तहान भागावी म्हणून पाण्याची गरज; स्वयंपाक, खाल्लेल्या अन्नाचा पाक, इत्यादिकांकरितां अग्नीची गरज; ओले पदार्थ सुकावे म्हणून वाऱ्याची गरज व इकडे तिकडे स्वैर हिंडतां यावें म्हणून आकाशाची गरज असते. तेव्हां आपल्या स्वार्थाकरितांच आपण पृथ्वी, आप इत्यादि भूतांवर प्रीती करितों; त्या भूतांकरितां नव्हे. ॥१८॥

- आतां 'न वा अरे सर्वस्य कामाय०' या वाक्याचें तात्पर्य -

स्वामिभृत्यादिकं सर्वं स्वोकाराय वांछति ।
तत्तत्कृतोपकारस्तु तस्य तस्य न विद्यते ॥१९

अन्वयार्थ - [स्वामिभृत्यादिकं सर्वं स्वोपकाराय वाञ्छति-] **धनी, सेवक इत्यादि सर्व आपल्या उपकाराकरितां प्राणी इच्छितो.** [तत्तत्कृतोपकार: तु तस्य तस्य न विद्यते-] **व त्या त्या स्वामि-भृत्यांनीं केलेला उपकार वस्तुत: त्यांच्यासाठीं नसतो, तर स्वत:साठीं असतो.**

प्रकाश:- प्राणी कोणत्याहि कां पदार्थांची इच्छा करीना, ती स्वत:च्या कल्याणाकरितां असते. धनी सेवकास जो पगार देत असतो तो त्याच्यावर उपकार करण्याकरितां नव्हे, तर आपल्या हिताकरितांच होय. त्याप्रमाणेंच सेवकाची सेवाहि वस्तुत: धन्याकरितां नसून आपल्या हिताकरितां होय. हाच प्रकार सर्वत्र जाणावा. ॥१९॥

-'पण श्रुतींत अशीं अनेक उदाहरणें कां प्रदर्शित केलीं आहेत ?' उत्तर -

सर्वव्यवहृतिष्वेवमनुसन्धातुमीदृशम् ।
उदाहरणबाहुल्यं तेन स्वां वासयेन्मतिम् ॥२०

अन्वयार्थ - [सर्वव्यवहृतिषु एवं अनुसंधातुं ईदृशं उदाहरणबाहुल्यं उक्तम्-] **इच्छापूर्वक भोजनादि सर्व व्यवहारांमध्यें 'आपल्या सुखासाठीं सर्व प्रिय होतें' अशा प्रकारें अनुसंधान करितां यावें म्हणून अशीं हीं पुष्कळ उदाहरणें दिलीं आहेत.** [तेन स्वां मतिं वासयेत्-] **त्या कारणानें आत्मविषयकबुद्धि दृढ करावी.**

प्रकाश:- इच्छापूर्वक होणारे जेवढे म्हणून भोजनादि व्यवहार आहेत, त्या सर्वांमध्यें स्वार्थ आहे, परार्थ नाहीं, असें अनुसंधान सहज करितां यावें म्हणून येथें अनेक दृष्टान्त दिलेले आहेत. त्यांवरून सर्व आत्म्याकरितां आहे, असा निश्चय करावा. व नंतर तोच अति प्रिय आहे, अशी सतत भावना ठेवावी. ॥२०॥

-'पण या प्रीतीचें स्वरूप काय आहे ?' असा प्रश्न व उत्तर --

अथ केयं भवेत्प्रीति: श्रूयते या निजात्मनि ।
रागो वध्वादिविषये श्रद्धा यागादिकर्मणि ।
भक्ति: स्याद्गुरुदेवादाविच्छा त्वप्राप्तवस्तुनि ॥२१॥

अन्वयार्थ - [या निजात्मनि प्रीति: श्रूयते सा इयं का भवेत्-] जी आपल्या आत्म्यावरील प्रीति श्रुत आहे ती कोणती ? [वध्वादिविषये राग:-] स्त्री, पुत्र, इत्यादिकांवरील आसक्ति ? [वा यागादिकर्मणि श्रद्धा-] कीं यज्ञ-यागादि कर्मावरील श्रद्धा [अथ वा गुरुदेवादौ भक्ति:-] कीं गुरुदेवादिकांवरील भक्ति [किंवा अप्राप्यवस्तुनि इच्छा प्रीति: स्यात्-] कीं अप्राप्य वस्तूविषयींची इच्छा ही प्रीति ?

प्रकाश:- आत्म्यामध्यें प्रीति असतें असें श्रुतीनें सांगितलें आहे हें खरें; पण ती प्रीति कशी असते हें स्पष्ट केलेलें नाहीं. यास्तव व्यवहारांत प्रत्ययास येणाऱ्या या चार प्रकारच्या प्रेमांपैकी प्रस्तुत प्रीति कोणती ? कीं ती यांहून निराळीच आहे ? यांतील कोणती तरी एक प्रीति आत्मप्रीति आहे, असें जर म्हटलें, तर ती एकदेशी आहे असें होणार. ॥२१॥

- या चारी पक्षांहून निराळाच पक्ष स्वीकारून उत्तर -

तर्ह्यस्तु सात्त्विकी वृत्ति: सुखमात्रानुवर्तिनी ।
प्राप्ते नष्टेऽपि सद्भावादिच्छातो व्यतिरिच्यते ॥२२

अन्वयार्थ - [तर्हि सुखमात्रानुवर्तिनी सात्त्विकी वृत्ति: अस्तु-] प्रीतीच्या रागादिरूपत्वाचा जर असंभव असेल-तर केवल सुखामध्यें अनुवृत्त होणारी सात्त्विकी-सत्त्वगुणपरिणामरूप चित्तवृत्तिच प्रीति असो; पण ती प्रीति म्ह० इच्छाच, अशी शंका घेऊन तिचा परिहार - [प्राप्ते नष्टे अपि अस्या: सद्भावात् इयं इच्छात: व्यतिरिच्यते-] कारण प्राप्त झालेलें सुखादि जरी नष्ट झालें तरी त्याविषयीं प्रीति असते, यास्तव ती इच्छेहून निराळी आहे.

प्रकाश:- स्त्रीपुत्रविषयक अनुराग व आपल्याजवळ नसलेल्या पदार्थाची इच्छा ही रजोगुणपरिणामरूप आहे. यास्तव सात्त्विकी हा शब्द येथें योजून त्यांचा निरास केला आहे. तात्पर्य, कोणतेंहि कां सुख असेना ? पण प्रत्येकामध्यें ज्या प्रीतीची अनुवृत्ति होतें, म्हणजे प्रत्येक सुखामध्यें जी असते, ती सात्त्विक प्रीति आम्हांस इष्ट होय. आतां ती इच्छेहून भिन्न आहे हें कशावरून, असें जर म्हणाल तर सांगतों. इच्छा इष्ट पदार्थ प्राप्त होई तोंच असते व ही सात्त्विक वृत्ति प्राप्त झालेलें सुख जरी नष्ट झालें तरी त्याविषयीं राहते. ॥२२॥

-'अहोपण, सुखसाधनभूत अन्नादिविषयांप्रमाणेंच आत्म्यामध्येंहि प्रीति दिसत असल्यामुळें आत्माहि अन्नादिकांप्रमाणें सुखसाधान होईल !' अशी शंका व समाधान -

सुखसाधनतोपाधेरन्नपानादय: प्रिया: ॥२३
आत्मानुकूल्यादन्नादिसमश्चेदमुनात्र क: ।
अनुकूलयितव्य: स्यान्नैकस्मिन्कर्मकर्तृता ॥२४

अन्वयार्थ - [अन्नपानादय: सुखसाधनतोपाधे: यथा प्रिया: दृष्टा:-] अन्नपानादि पदार्थ 'सुखसाधनता' याच उपाधीमुळें जसे प्रिय होतात [तथा आत्मा अपि आनुकूल्यात् अन्नादिसम: इति चेत्-] तसाच आत्माहि प्रिय वाटत असल्यामुळें तो अन्नादिकांसारखाच आहे, असें जर म्हणशील, तर [अमुना अत्र क: अनुकूलयितव्य:-] या लोकीं सुखसाधनता या रूपानें स्वत: अनुकूल असलेल्या यानें अनुकूल करून घेण्यास योग्य असा दुसरा भोक्ता कोण आहे ? कोणीच नाहीं. आत्माच भोक्ता आहे. तो स्वत:च स्वत:ला अनुकूल करून घेईल म्हणून म्हणावें तर [एकस्मिन् कर्मकर्तृता न स्यात्-] एकाच आत्म्यामध्यें एकाच वेळीं उपकार्य व व उपकारकत्व म्ह० कर्मत्व व कर्तृत्व संभवत नाहीं.

प्रकाश:- जें जें सुखाचें साधन असतें, तें तें प्रिय वाटतें असा नियम आहे. त्यामुळें प्रिय वाटणारा आत्माहि सुखसाधन आहे, असा निश्चय करितां येतो,

असें जर म्हटलें, तर तें बरोबर नाहीं. कारण सुखसाधनरूप अशा या आत्म्यानें प्रसन्न कोणास करावें ? हा येथें प्रश्न येतो. आत्मा हा एक, अखंड, चैतन्य व नित्य असल्यामुळें तो ज्याला प्रसन्न करील असा पदार्थच या जगांत नाहीं. सारांश, आपल्या खांद्यावर बसून आपणांस कोठें जातां येणें जसें अशक्य आहे, तसेंच आत्मा दुसऱ्या कोणा भोक्त्यास प्रसन्न करील, हें म्हणणें अशक्य आहे. ॥२३॥२४॥

-'अहोपण, आत्म्याला अन्नादिकांप्रमाणें सुखसाधनत्व जरी नसलें तरी सुखाप्रमाणें भोक्तृशेषत्व असेल' अशी आशंका घेऊन 'आत्म्याला निरतिशय प्रेमास्पदत्व असल्यामुळें तसें म्हणतां येत नाहीं,' असा परिहार--

सुखे वैषयिके प्रीतिमात्रमात्मा त्वतिप्रिय: ।
सुखे व्यभिचरत्येषा नात्मनि व्यभिचारिणी ॥२५

अन्वयार्थ - [वैषयिके सुखे प्रीतिमात्रं-] विषयजन्य सुखामध्यें सामान्य प्रीति असते. [आत्मा तु अतिप्रिय:-] पण आत्मा अतिप्रिय आहे. तो निरतिशय प्रेमाचा विषय आहे. त्यामुळें तो विषयजन्य सुखासारखा नाहीं. या दोन्ही विषयीं उपपत्ति- [सुखे एषा व्यभिचरति आत्मनि न व्यभिचारिणी-] विषयसुखांतील प्रीति त्यास सोडून अन्यत्र जाते, पण आत्म्याच्या ठिकाणीं असणारी प्रीति आत्म्यास सोडून जात नाहीं.

प्रकाश:- विषयप्रीति सर्वसामान्य असते. म्हणजे ती आत्म्याच्या प्रीतिप्रमाणें निरतिशय नसते. आत्मा अतिशय प्रिय असतो. शिवाय विषयांविषयींची प्रीति पुष्कळ काळ टिकत नाहीं. कांहीं निमित्त झालें असतां ती नाहींशी होते. व पूर्वीं जो एकादा विषय अप्रिय असतो, तोच पुढें प्रिय होतो. पण आत्मप्रीतीचा तसा प्रकार नाहीं. आत्म्यावर एकदा प्रीति बसली कीं ती यावज्जीव राहते व उत्तरोत्तर वाढत जाते. ॥२५॥

-सुखविषयक प्रीतीचा व्यभिचार दाखवितात -

एकं त्यक्त्वाऽन्यदादत्ते सुखं वैषयिकं सदा ।
नात्मा त्याज्यो न चादेयस्तस्मिन्व्यभिचरेत्कथम्
॥२६

अन्वयार्थ - [एकं वैषयिकं सुखं त्यक्त्वा सदा अन्यत् आदत्ते-] एक वैषयिक सुख सोडून प्राणी सर्वदा दुसऱ्याचें ग्रहण करितो. आत्म्यामध्यें तशा व्यभिचाराचा अभाव दाखवितात- [आत्मा न त्याज्य: च न आदेय:-] आत्मा त्याज्य नाहीं व ग्राह्यहि नाहीं. [तस्मिन् कथं व्यभिचरेत्-] तेव्हां त्याच्याविषयींची प्रीति व्यभिचरित कशी होणार !

प्रकाश:- एक विषयसुख सोडून दुसरें घेतां येतें. पण आत्मा नित्य असल्यामुळें त्याचा त्याग किंवा ग्रहण करतां येत नाहीं. तेव्हां त्याच्याविषयींची प्रीति व्यभिचरित कशी होणार ? ॥२६॥

-आत्मा त्याग व ग्रहण यांचा विषय जरी होत नसला तरी तृणादिकांप्रमाणें उपेक्षेचा विषय कां होणार नाहीं ?' अशी शंका गेऊन तिचा परिहार -

हानादानविहीनेऽस्मिन्नुपेक्षा चेत्तृणादिवत् ।
उपेक्षितु: स्वरूपत्वान्नोपेक्ष्यत्वं निजात्मन: ॥२७

अन्वयार्थ - [हानादानविहीने अस्मिन् तृणादिवत् उपेक्षा चेत्-] त्याग व स्वीकार यांनीं रहित अशा या आत्म्याविषयीं तृणादि तुच्छ पदार्थांप्रमाणें उपेक्षा करावी असें जर म्हणावें तर [उपेक्षितु: स्वरूपत्वात् निजात्मन: उपेक्ष्यत्वं न-] आत्मा हेंच उपेक्षा करणाऱ्याचें स्वरूप असल्यामुळें स्वात्म्याची उपेक्षा करितां येण्यासारखी नाहीं.

प्रकाश:- आत्मा त्यागास व स्वीकारास योग्य नाहीं. यास्तव त्याची उपेक्षा करावी हें म्हणणें सयुक्तिक नव्हे. कारण उपेक्षा करणारा पुरुष व आत्मा हे दोघे एकच असल्यामुळें कोणालाहि झालें तरी त्याची उपेक्षा कशी करिता येईल ? सारांश आत्म्याविषयीं

उदासीनहि होतां येत नाहीं. ॥२७॥

आत्मा परित्यागाचा विषय होत नाहीं, हें म्हणणें अयोग्य आहे. कारण द्वेषामुळें त्याला 'याज्यत्व असल्याचा अनुभव येतो' अशी शंका --

रोगक्रोधाभिभूतानां मुमूर्षा वीक्ष्यते क्वचित् ।
ततो द्वेषाद्भवेत्त्याज्य आत्मेति यदि तन्न हि ॥२८

अन्वयार्थ - [रोगक्रोधाभिभूतानां क्वचित् मुमूर्षा वीक्ष्यते-] रोग, क्रोध, इत्यादिकांच्या योगानें व्याकुल झालेल्या लोकांना केव्हां केव्हां मरणाची इच्छा झाल्याचें दिसतें. [ततः द्वेषात् आत्मा त्याज्यः भवेत् इति यदि-] त्यावरून 'द्वेषामुळें आत्मा त्याज्य होतो,' असें जर म्हणशील [तर्हि तत् न-] तर तें बरोबर नव्हे.

प्रकाश:- आम्लपित्त, पोटशूळ, उपदंश इत्यादि असह्य रोगांच्या योगानें व अतिशय क्रोध आला असतां कोणी कोणी मरणाची इच्छा करितात. फार काय, पण स्वतःच्या देहाचा आपल्या हातानेंच नाश करितात. असा प्रकार पाहिला कीं आत्मा त्याज्यच आहे असें वाटतें, अशी येथें शंका घेतली आहे; आणि 'तें बरोबर नाहीं' या शेवटच्या वाक्यानें तिचा निरास करण्याची येथें प्रतिज्ञा केली आहे. ॥२८॥

-'कारण त्या त्यागाचा विषय आत्मा नसून त्याहून अगदीं निराळा असलेला देह आहे,' असा आतां पूर्वोक्त शंकेचा परिहार करितात -

त्यक्तुं योग्यस्य देहस्य नात्मता त्यक्तुरेव सा ।
न त्यक्तर्य्यस्ति स द्वेषस्त्याज्ये द्वेषे तु का क्षतिः ॥२९

अन्वयार्थ - [त्यक्तुं योग्यस्य देहस्य आत्मता न-] त्याग करण्यास योग्य असलेल्या देहाला आत्मत्व नाहीं, [किं तु सा त्यक्तुः एव--] तर तें देहाचा त्याग करणाऱ्या देहातिरिक्त जीवालाच आहे. [अतः सः द्वेषः त्यक्तरि न अस्ति-] यास्तव पूर्वोक्त द्वेष त्याग करणाऱ्या आत्म्याचे ठिकाणीं नसतो. म्हणून आत्म्याला त्याज्यत्व नाहीं. [त्याज्ये द्वेषे तु का क्षतिः-] आतां त्याग करण्यास योग्य असलेल्या देहाविषयीं जर द्वेष असला तर त्यांत 'आत्म्याच्या त्यागाचा असंभव आहे,' असें म्हणणाऱ्या माझी काय हानि आहे ?

प्रकाश:- अति पीडा झाली असतां प्राणी जीवहि देतो हें खरें, पण तो जीव देतो म्हणजे काय करितो ? देहसंबंध तोडतो असेंच कीं नाहीं ? आत्म्याचा तर संबंध त्याच्यानें तोडवतच नाहीं; आत्मसंबंध तोडतां कसा येईल ? कारण आपल्या स्वभावभूत स्वरूपास कधीं कोणी आजपर्यंत सोडलें आहे का ? अर्थात् त्याग करितां येण्यासारखा अनात्मपदार्थाचा त्याग केल्यास त्यांत कांहीं हानि नाहीं. सारांश, रोगी, क्रोधी इत्यादि पुरुषामध्यें जो द्वेष आढळतो, तो आत्म्याविषयीं नसून अनात्म्याविषयींच होय. ॥२९॥

-याप्रमाणें 'न वा अरे पत्युः कामाय' येथून 'आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति' येथपर्यंतच्या श्रुतीच्या तात्पर्याचें पर्यालोचन करून आत्म्याचें प्रियतमत्व प्रदर्शित केलें. आतां युक्तितःहि तेच प्रदर्शित करितात --

आत्मार्थत्वेन सर्वस्य प्रीतेश्चात्मा ह्यतिप्रियः ।
सिद्धो यथा पुत्रमित्रात्पुत्रः प्रियतरस्तथा ॥३०

अन्वयार्थ - [यथा पुत्रमित्रात् पुत्रः प्रियतरः-] ज्याप्रमाणें पुत्राच्या मित्राहून पुत्र अधिक प्रिय असतो, [तथा सर्वस्य आत्मार्थत्वेन प्रीतेःच आत्मा अतिप्रियः सिद्धः हि-] त्याप्रमाणें सुखासह पतिजायादि सर्व भोग्यजात आत्मोपकारक या रुपानें प्रिय वाटत असल्यामुळेंहि आत्मा अतिप्रिय आहे, असें सिद्ध झालें.

प्रकाश:- पुत्राच्या मित्रावरहि बापाची प्रीति असते पण ती साक्षात् नव्हे. पुत्राच्या द्वारा होय, त्यामुळें

पुत्रप्रीति मुख्य व तिच्याकरितां त्याच्या मित्रावरील प्रीति गौण हें उघड आहे. त्याच न्यायानें प्राणी भोग्य पदार्थांवर जी प्रीति करीत असतो ती मुख्य नव्हे. कारण ती आत्म्याच्या द्वारा त्यांच्यावर बसते. साक्षात् नव्हे, अर्थात् आत्म्यावरील प्रीति मुख्य होय. शिवाय, आत्मा ज्याचा त्याचा ज्याला त्याला अति प्रिय वाटत असल्यामुळें तो अति प्रिय व भोग्य पदार्थ नुस्ते प्रिय असेंहि ठरतें. ॥३०॥

- याप्रमाणें आत्म्याविषयींच्या निरतिशय प्रीतीचें श्रुति व युक्ति यांच्या योगानें उपपादन करून स्वानुभवप्रदर्शनानें तेंच दृढ करितात --

मा न भूवमहं किंतु भूयासं सर्वदेत्यसौ ।
आशी: सर्वस्य दृष्टेति प्रत्यक्षा प्रीतिरात्मनि ॥३१

अन्वयार्थ - [अहं मा भूवं इति न-] मी नसावें असें नाहीं. [किं तु सर्वदा भूयासं-] तर सर्वदा असावें, [इति असौ आशी: सर्वस्य दृष्टा--] अशी ही आशा सर्वांची दिसते. [इति आत्मनि प्रीति: प्रत्यक्षा अस्ति--] *याप्रमाणें आत्म्यावरील* निरतिशय प्रीति प्रत्यक्षसिद्ध आहे.

प्रकाश:- कोणत्याहि काळीं व कोणत्याहि स्थळीं माझें नास्तित्व न व्हावें, तर मी सदा विद्यमान् असावें, अशा प्रकारची ही इच्छा प्रत्येक प्राण्यास असते. हेंच आत्मप्रीतीचें प्रत्यक्ष प्रमाण होय. म्हणजे ती इतकी प्रत्यक्ष असतांना तिच्याविषयीं वाद करीत बसणें अयुक्त आहे. ॥३१॥

-यासंबंधीं दुसऱ्या मताचें निरसन करण्यासाठीं त्याचा अनुवाद -

इत्यादिभिस्त्रिभि: प्रीतौ सिद्धायामेवमात्मनि ।
पुत्रभार्यादिशेषत्वमात्मन: कैश्चिदीरितम् ॥३२

अन्वयार्थ - [इत्यादिभि: त्रिभि: एवं आत्मनि प्रीतौ सिद्धायां सत्यां-] अनुभव, युक्ति व श्रुति या तीन प्रमाणांनीं पूर्वोक्त प्रकारें आत्म्यावरील प्रीति सिद्ध झाली असतांहि [कैश्चित् आत्मन: पुत्रभार्यादिशेषत्वं ईरितं अस्ति--] श्रुत्यादिकांचें तात्पर्य न जाणणाऱ्या कित्येकांनीं आत्मा पुत्र भार्यादि भोग्य पदार्थांचा शेष, त्यांचें भोगसाधन आहे, असें सांगितलें आहे.

प्रकाश:- पूर्वोक्त श्रुति, युक्ति व अनुभव यांच्या योगानें आत्मप्रीति नि:संशयपणें सिद्ध होत असतांनाहि कित्येक शास्त्रपरिचयशून्य पुरुष आत्म्यास पुत्रादिकांचें शेषत्व आहे म्हणजे त्यांच्या सुखादिकांकरितां आत्मा आहे, आत्म्याकरितां ते नव्हेत, असें नि:शंकपणें म्हणत असतात. ॥३२॥

-हें कशावरून म्हणून विचाराल तर सांगतों-

एतद्विवक्षया पुत्रे मुख्यात्मत्वं श्रुतीरितम् ।
आत्मा वै पुत्रनामेति तच्चोपनिषदि स्फुटम् ॥३३

अन्वयार्थ - [एतद्विवक्षया 'आत्मा वै पुत्रनामा' इति पुत्रे मुख्यात्मत्वं श्रुतीरितं अस्ति--] कित्येक असें म्हणतात, हें अभिव्यक्त करण्याच्या इच्छेनें 'आत्माच पुत्र आहे' अशा अर्थाच्या श्रुतीनें पुत्राचें *मुख्य आत्मत्व सांगितलें आहे* [तत् च उपनिषदि स्फुटम्-] व तें पुत्राचें मुख्यात्मत्व ऐतरेयादि उपनिषदांत स्पष्ट सांगितलें आहे.

प्रकाश:- असें कित्येक म्हणतात, हें सांगण्याच्या उद्देशानें 'प्रसिद्ध आत्माच पुत्रसंज्ञक आहे' इत्यादि श्रुतीनें पुत्र मुख्य आत्मा आहे असें सांगितलें जात आहे. शिवाय हीच गोष्ट ऐतरेयादि उपनिषदांतून स्पष्टपणें सांगितलें आहे. ॥३३॥

-'कोणत्या वाक्यानें तसें सांगितलें आहे,' अशी आकांक्षा झाली असतां तें वाक्यच अर्थत: पढतात -

सोऽस्यायमात्मा पुण्येभ्य: कर्मभ्य: प्रतिधीयते
अथास्येतर आत्मायं कृतकृत्य: प्रमीयते ॥३४

अन्वयार्थ - [अस्य स: अयं आत्मा पुण्येभ्य; कर्मभ्य: प्रतिधीयते-] ह्याचा तो हा आत्मा पुण्यकर्मानुष्ठानार्थ प्रतिनिधि केला जातो. [अथ

अस्य इतर: अयं आत्मा कृतकृत्य: सन् प्रमीयते-] व नंतर ह्याचा हा दुसरा आत्मा कृतकृत्य होऊन मरतो.

प्रकाश:- 'पुरुषे ह वा अयं आदितो गर्भो भवति'- ऐ. भा. ५.१. - या श्रुतिवचनांत पुरुषशरीरांतील गर्भत्वानें सांगितलेला व 'सोऽग्र एव कुमारं जन्मनोऽग्रेऽधिभावयति' - (ऐ.) हा पुत्ररूप गर्भ प्रथमत: पुरुषाच्या शरीरांत असतो. इत्यादि प्रकारें ऐतरेयाच्या दुसऱ्या अध्यायांत गर्भ प्रकरण आहे. हा पुत्ररूप आत्मा विद्या, सामर्थ्य इत्यादिकांनीं युक्त झाला असतां पिता त्याला आपल्या पुण्यकर्मामध्यें नियुक्त करितो. म्हणजे तो त्यास प्रतिनिधि करितो. प्रतिनिधि म्हणजे बदली काम करणारा. पुढें पित्याचा हा प्रत्यक्ष दिसणारा शरीररूप आत्मा वृद्धावस्थेमुळें जीर्ण झाला असतां मृत होतो. पण त्यानें सर्व कर्तव्यकर्में केलीं असल्यास त्यास कृतकृत्य म्हणतात. तात्पर्य, येथें पुत्रास आत्मा असें म्हटलें आहे. ॥३४॥

- हाच अर्थ दृढ करण्याकरितां 'नापुत्रस्य लोकोऽस्ति' या पुत्ररहिताला परलोक नाहीं असें सांगणाऱ्या दुसऱ्या एका वाक्याचा अर्थत: निर्देश करितात -

सत्यप्यात्मनि लोकोऽस्ति नापुत्रस्यात एव हि ।
अनुशिष्टं पुत्रमेव लोक्यमाहुर्मनीषिण: ॥३५

अन्वयार्थ - [अत: एव-] ज्या अर्थीं पुत्राला मुख्य आत्मत्व आहे त्या अर्थींच [आत्मनि सति अपि-] आपला आत्मा विद्यमान असतांनाहि [अपुत्रस्य लोक: न अस्ति हि-] ज्याला पुत्र नसतो त्याला पितृलोक मिळत नाहीं, असें पुराणादिकांतून वर्णन केलें आहे. व्यतिरेकमुखानें सांगितलेला हा अर्थच अन्वयमुखानें सांगणाऱ्या 'अनुशिष्टं पुत्रं लोक्यमाहु:' - बृ. भा. १.५.१७. या वाक्याचा अर्थत: उल्लेख - [मनीषिण: अनुशिष्टं एव पुत्रं लोक्यं आहु:-] शास्त्रज्ञ पुरुष 'त्वं ब्रह्म, इत्यादि मंत्रांच्या योगानें ज्यास उपदेश केला आहे असाच पुत्र परलोकाचें साधन होतो, असें सांगतात.

प्रकाश:- स्वत:चा देहसंज्ञक आत्मा जरी असला तरी हा पुत्ररुपी मुख्य आत्मा नसल्यास त्यास पितृलोक मिळत नाहीं, असें स्पष्टपणें सांगितलेलें आहे. म्हणजे या प्रसिद्ध आत्म्याचा परलोकाकरितां मुळींच उपयोग होत नाहीं. शास्त्रकारांचेंहि असेंच मत आहे. ॥३५॥

-आतां ऐहिक सुखहि पुत्रामुळेंच मिळत असतें, असें प्रतिपादन करणारें 'हा मनुष्य लोक पुत्राच्या योगानेंच जिंकतां येण्यासारखा आहे.' - बृ. भा. १.५.१६. पहा.- इत्यादि श्रुतिवाक्य अर्थत: येथें देतात -

मनुष्यलोको जय्य: स्यात्पुत्रेणैवेतरेण नो ।
मुमूर्षुर्मंत्रयेत्पुत्रं त्वं ब्रह्मेत्यादिमन्त्रकै: ॥३६

अन्वयार्थ - [मनुष्यलोक: पुत्रेण एव जय्य: स्यात्-] मनुष्यलोकचें सुख पुत्राच्या योगानेंच जिंकणें - संपादन करणें शक्य आहे; [इतरेण नो-] दुसऱ्या कर्मादि साधनानें मुळींच नाहीं. कारण पुत्ररहित पुरुषाला धनादि सुखसाधनहि विरक्त करितें. आतां पूर्वोक्त पुत्रानुशासनाचा अवसर सांगतात - [मुमूर्षु: 'त्वं ब्रह्म,' इत्यादि मंत्रकै: पुत्रं मंत्रयेत्-] मरावयास टेंकलेला पिता 'तूं यज्ञ आहेस, तूं लोक आहेस, तूं ब्रह्म आहेस' या तीन मंत्रांनीं मरणसमयीं पुत्राला उपदेश करितो.

प्रकाश:- पुत्र नसल्यास गृहस्थास इतर सर्व सुखें तुच्छ वाटतात. हें अनुभवसिद्ध आहे. त्यावरून पुत्र हेंच ऐहिक सुखाचें साधन आहे. कर्म, वित्त इत्यादि दुसरें कोणतेंहि नाहीं, हें निर्विवाद होय. मरणकाल समीप आला असतां पिता पुत्रास जवळ बसवून 'तूं

यज्ञ आहेस, तूं लोक, तूं ब्रह्म आहेस' इत्यादि अर्थाच्या मंत्रांनीं उपदेश करितो, हेंहि वैदिकधर्मानुयायी लोकांस ठाऊक आहे. ॥३६॥

- उक्तार्थाचा उपसंहार -

इत्यादिश्रुतय: प्राहु: पुत्रभार्यादिशेषताम् ।
लौकिका अपि पुत्रस्य प्राधान्यमनुमन्वते ॥३७

अन्वयार्थ - [इत्यादि श्रुतय: पुत्र-भार्या-दिशेषतां प्राहु:-] इत्यादि अनेक श्रुति आत्मा पुत्रभार्यादिकांचा शेष आहे, असें सांगतात. हा अर्थ केवल श्रुतिसिद्धच नाहीं तर लोकप्रसिद्धंहि आहे, असें सांगतात -- [लौकिका: अपि पुत्रस्य प्राधान्यं अनुमन्वते--] व्यवहारी लोकहि पुत्राच्या प्राधान्याला अनुमोदन देतात.

प्रकाश:- 'पत्नी हा आत्म्याचा अर्धा भाग आहे'' इत्यादि दुसऱ्याहि अनेक श्रुति पुत्र, भार्या इत्यादि पदार्थ सुखाचीं साधनें आहेत व आत्मा त्यांचा शेष आहे असें सांगतात. स्मृत्यादिकांतहि असेंच सांगितलें आहे. ॥३७॥

- त्याविषयीं उपपत्ति -

स्वस्मिन्मृतेऽपि पुत्रादिर्जीवेद्वित्तादिना यथा ।
तथैव यत्नं कुरुते मुख्या: पुत्रादयस्तत: ॥३८

अन्वयार्थ - [यत: स्वस्मिन् मृते अपि पुत्रादि: वित्तादिना यथा जीवेत् तथा एव यत्नं कुरुते-] ज्या अर्थीं पिता वगैरे आपण मेल्यावरहि पुत्रभार्यादिक वित्त क्षेत्रादिकांनीं जसे जिवंत राहतील, तसाच प्रयत्न करितो, स्वत: प्रयास करूनहि पुत्रादिकांच्या जीवनाचा उपाय संपादन करितो; [तत: पुत्रादय; मुख्या:-] त्या अर्थीं पुत्रादिक मुख्य प्रधान आहेत.

प्रकाश:- आपण कधीं तरी मरणार खास हें ठाऊक असतांनाहि पुरुष आपल्या मागें आपल्या पुत्रादिकांची उत्तम तजवीज करून ठेवण्याकरितां आपल्या समजुतीप्रमाणें खटपट करीत असतो, हें सर्वांस ठाऊक आहे. व त्यामुळें पुत्रादिकच मुख्य आहेत असें म्हटल्यावांचून राहावत नाहीं. ॥६८॥

-वाद्याचें हें सर्व म्हणणें कंबूल करून 'तरी सुद्धां आत्मा त्यांचा शेष ठरत नाहीं' असें सिद्धान्ती प्रतिपादन करितात -

बाढमेतावता नात्मा शेषो भवति कस्यचित् ।
गौणमिथ्यामुख्यभेदैरात्मायं भवति त्रिधा ॥३९

अन्वयार्थ - [बाढं-] खरें आहे. [एतावता आत्मा कस्यचित् शेष: न भवति-] पण पुत्रादिकांना कांहीं प्रसंगीं प्राधान्य असतें एवढ्यावरूनच आत्मा कोणाचा शेष आहे असें होत नाहीं. नुसत्या प्रतिज्ञेनेंच अर्थ सिद्ध होत नाहीं तर प्रमाण व युक्ति यांनीं अर्थसिद्धि होते. अर्थात् ज्या ज्या व्यवहारांत ज्याचें ज्याचें आत्मत्व विवक्षित असतें त्याला त्याला प्राधान्य असतें, हें प्रदर्शित करण्याच्या उद्देशानें आत्म्याचें त्रिविधत्व सांगतात - [अयं आत्मा गौण-मिथ्या मुख्यभेदै:त्रिधा भवति-] हा आत्मा गौण, मिथ्या व मुख्य असा तीन प्रकारचा आहे.

प्रकाश:- पुत्र, भार्या इत्यादि पदार्थांची श्रुति, स्मृति, व पुराणें यामध्यें आत्मा या संज्ञेनें जरी स्तुति केलेली असली, तरी तेवढ्यावरून हा आत्मा कोणाचा शेष आहे असें होत नाहीं. आत्मा गौण, मिथ्या व मुख्य असा तीन प्रकारचा आहे; व त्यामुळें पुत्रादि अनात्म पदार्थांस उद्देशूनहि शास्त्रांत त्याचा प्रयोग होणें अशक्य नाहीं. ॥३९॥

- त्यांतील पुत्रादि आत्मा गौण आहे, हें दाखविण्याकरितां लौकिक गौण प्रयोगाचें उदाहरण देऊन याची पुत्रादिकांत योजना करितात -

देवदत्तस्तु सिंहोऽयमित्यैक्यं गौणमेतयो: ।
भेदस्य भासमानत्वात्पुत्रादेरात्मता तथा ॥४०

अन्वयार्थ - [अयं देवदत्त: सिंह: इति एतयो:

ऐक्यं भेदस्य भासमानत्वात् गौणम्-] 'हा देवदत्त सिंह आहे' असें देवदत्त व सिंह यांचें ऐक्य, त्यांचे भेद स्पष्ट भासत असल्यामुळें, गौण आहे. **[पुत्रादेः आत्मता अपि तथा-]** पुत्रादिकांची आत्मताहि तशीच गौण आहे.

प्रकाश:- देवदत्त व सिंह हे दोन भिन्न पदार्थ आहेत. पण असें असतांनाहि 'हा देवदत्त सिंह आहे' असा व्यवहारांत शब्दप्रयोग होत असल्यामुळें 'देवदत्त व सिंह' यांचें ऐक्य गौण आहे, मुख्य नव्हे, असेंच मानावें लागतें. पुत्रास आत्मा म्हणणें हेंहि तसेंच समजावें. म्हणजे आत्मा व पुत्र हे भिन्न पदार्थ असल्यामुळें 'पुत्र माझा आत्मा आहे' हें म्हणणें मुख्य नव्हे, तर तें गौण होय. कारण अगदीं भिन्न अशा पदार्थांचें खरोखरोच ऐक्य होणें युक्तिशून्य आहे. ॥४०॥

-आतां मिथ्या आत्मा कोणता तें सांगतात -

भेदोऽस्ति पंचकोशेषु साक्षिणो न तु भात्यसौ ।
मिथ्यात्मताऽतः कोशानां स्थाणोश्चोरात्मता तथा ॥४१

अन्वयार्थ - [पंचकोशेषु साक्षिण: भेद: अस्ति तु असौ न भाति-] आनंदमयापासून अन्नमयापर्यंत जे पांच कोश त्यांचा साक्षी आत्म्यापासून विद्यमान असलेलाहि भेद प्रतीत होत नाहीं. **[अत: स्थाणोः चोरात्मता यथा मिथ्या तथा कोशानां आत्मता मिथ्या अस्ति --]** त्यामुळें स्थाणूचें चोररूपत्व जसें मिथ्या तसें कोशांचें आत्मत्व मिथ्या आहे.

प्रकाश -- अन्यमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय हे पांचहि कोश साक्षी आत्म्याहून भिन्न आहेत, पण तो त्यांचा भेद कांहीं केल्या भासत नाहीं. तर त्यांचें तादात्म्य आहे असा सर्व उच्च नीच प्राण्यांस अनुभव येतो, तस्मात् कोशांच्या ठिकाणीं भासणारा आत्मभाव मिथ्या आहे. यास दृष्टान्त - एकाद्या खांबास पाहून हा चोर आहे असें जर कोणास वाटलें व त्यामुळें तो भयभीत झाला तर त्या भासलेल्या चोरास काय म्हणतां येईल ! कारण खांब असतांना तो न भासणें व त्याच्या ठिकाणीं चोराचा प्रत्यय येणें हा शुद्ध भ्रम आहे. त्यामुळें खांबाची चोरता मिथ्या (भ्रामक) आहे असेंच म्हणावें लागते. गौण प्रयोगांत दोन्ही पदार्थ भिन्न भिन्न भासत असतांना त्यांचें ऐक्य करितात व मिथ्या ज्ञानांत एकाचे ठायीं दुसऱ्याचें भान होतें. हा या उभय ज्ञानांत फरक आहे. ॥४१॥

-याप्रमाणें गौण व मिथ्या आत्म्यांचें उपपादन करून साक्षीच्या मुख्यात्मत्वाचें उपपादन करितात -

न भाति भेदो नाप्यस्ति साक्षिणोऽप्रतियोगिनः ।
सर्वांतरत्वात्तस्यैव मुख्यमात्मत्वमिष्यते ॥४२

अन्वयार्थ - [अप्रतियोगिन: साक्षिण: भेद: न भाति न अस्ति अपि--] प्रतियोगी नसणाऱ्या साक्षी आत्म्याचा भेद भासत नाहीं व तो नाहींहि. **[सर्वान्तरत्वात् तस्य एव मुख्य आत्मत्वं इष्यते --]** तो सर्वांच्या आंत राहाणारा असल्यामुळें त्यालाच मुख्य आत्मत्व आहे.

प्रकाश:- ज्याप्रमाणें पुत्रादि गौणात्मा व देहादि मिथ्यात्मा प्रतियोगी असतात तसा स्वयं आत्मा कोणाचाच नसतो. प्रतियोगी म्ह० पुत्रादि व देहादि यांचा इतर पदार्थाहुन भेद असतो, पण साक्षिरूप आत्म्याचा कोणत्याहि पदार्थापासून कधींच भेद नसतो. म्हणून तो सर्वदा अप्रतियोगी आहे. ज्यांचा भेद असतो ते परस्पर प्रतियोगी असतात. आत्मा सर्वांचें अधिष्ठान आहे. त्यामुळें सर्व त्याच्यावर आरोपित आहे. 'अहोपण, भेदाच्या अभावीं साक्षी आत्म्याला गौणत्व व मिथ्यात्व जरी नसलें तरी मुख्यात्मत्व कसें ?' उत्तर - सर्वसाक्षी प्रत्यगात्मा देहपुत्रादि सर्वांच्या आंत असतो, अशी प्रतोति येत असल्यामुळें त्यालाच मुख्यात्मत्व आहे. याविषयीं अनुमान असें करावें - साक्षी मुख्य आत्मा आहे.

कारण तो सर्वांन्तर आहे. जो मुख्यात्मा नसतो तो सर्वान्तरहि नसतो. जसा अहंकारादिक. ॥४२॥

-'अहोपण, आत्मा असा त्रिविध जरी असला तरी पुत्रादिकांना शेषित्व आहे व आत्मा त्यांचा शेष आहे, असे जें आम्ही म्हणतों त्याचें निरसन कसें होतें ?' उत्तर-

सत्येवं व्यवहारेषु येषु यस्यात्मतोचिता ।
तेषु तस्यैव शेषित्वं सर्वस्यान्यस्य शेषता ॥४३

अन्वयार्थ - **[एवं सति येषु व्यवहारेषु यस्य आत्मता उचिता तेषु तस्य एव शेषित्वं-] याप्रमाणें आत्म्याचें त्रिविधत्व सिद्ध झालें असतां ज्या लौकिकवैदिक म्ह० पालन, पोषण, ब्रह्मात्मत्व इत्यादि व्यवहारांत ज्या पुत्रादिकाला, देहादिकाला किंवा साक्षीला आत्मत्व उचित आहे, त्या व्यवहारांत त्याला शेषित्वप्रधानत्व व [सर्वस्व अन्यस्य शेषता--] दुसऱ्या सर्वाला शेषत्व-गौणत्व आहे.**

प्रकाश:- असो; आत्मा तीन प्रकारचा आहे, हें एवढ्यावरून ठरलें असतां पालनपोषणादि लौकिक व ब्रह्मानुसंधानादि वैदिक व्यवहारांमध्यें ज्या पुत्रादि, देहादि किंवा साक्षी आत्म्यास आत्मा मानणें उचित असेल, त्या देहादिकांसच शेषि म्हणणें, व इतरांस त्याचा शेष म्हणणें युक्त होय. याचा पुढील पांच श्लोकांत अधिक विस्तार होणार आहे. ॥४३॥

- याचेंच पांच श्लोकांनीं विवरण -

मुमूर्षोर्गृहरक्षादौ गौणात्मैवोपयुज्यते ।
न मुख्यात्मा न मिथ्यात्मा पुत्र: शेषी भवत्यत: ॥४४

अन्वयार्थ - **[मुमूर्षो: गृहरक्षादौ गौणात्मा एव उपयुज्यते-] मरावयास टेंकलेल्या पुरुषाच्या गृहरक्षणादि विशेष कर्मामध्यें पुत्र-भार्यादिरूप गौण आत्म्याचाच उपयोग होतो. कारण तीं त्याच्या मागें जिवंत राहातात. [मुख्यात्मा न--] मुख्यात्मा-- साक्षी निर्विकार असल्यामुळें त्या कामीं उपयोगी नसतो. [मिथ्यात्मा अपि न -] त्याचा मिथ्यात्मा मरणोन्मुख झाल्यामुळें त्याचाहि कांहीं उपयोग नसतो. [अत: पलत्र: शेषी भवति-] यास्तव अशा प्रसंगीं पुत्र शेषी-प्रधान आहे.**

प्रकाश:- स्वत: मरणार असें समजल्यावर देहादि मिथ्या आत्मा किंवा साक्षी यांचा मालमत्तेच्या रक्षणामध्यें मुळींच उपयोग होणार नाहीं असें वाटणेंहि साहजिक आहे. यास्तव पित्यास पुत्रासारख्या गौण आत्म्याकडेच तें काम द्यावें लागतें. व अशा प्रसंगीं तोच शेषी होय. कारण साक्षी निर्विकार असतो व देहरूप मिथ्या आत्मा तर मरणानंतर काष्ठरूप होणार हें त्यास पक्कें ठाऊक असतें. ॥४४॥

-आतां स्वत: विद्यमान असतांनाहि गृहादिकांच्या रक्षणाकरितां पुत्ररूप आत्म्याचा तो कसा स्वीकार करितो, त्याविषयीं दृष्टान्त देतात -

अध्येता वह्निरित्यत्र सन्नप्यग्निर्न गृह्यते ।
अयोग्यत्वेन योग्यत्वाद्बटुरेवात्र गृह्यते ॥४५

अन्वयार्थ - **["अध्येता वह्नि:" इति अत्र सन् अपि अग्नि: अयोग्यत्वेन न गृह्यते-] 'हा अध्ययन करणारा अग्नि आहे' या वाक्यांत अग्नि विद्यमान असतांनाहि तो अध्ययनास अयोग्य असल्यामुळें 'अग्नि-' शब्दानें त्याचें ग्रहण केलें जात नाहीं. [किंतु योग्यत्वात् अत्र बटु: एव गृह्यते-] तर अशा प्रसंगीं योग्य असलेल्या बटूचेंच ग्रहण केलें जातें.**

प्रकाश:- 'हा अध्ययन करणारा अग्नि आहे' असें म्हणतांच कोणीहि झाला तरी अध्ययन करणाऱ्या ब्रह्माचाऱ्याचेंच ग्रहण करील, हें उघड आहे. कारण जड अग्नीस अध्ययन करिता येणें शक्य नाहीं, हें बहुतेक सर्वांस ठाऊक असतें. तसेंच मरणोन्मुख मनुष्य जरी विद्यमान असला तरी तो पुत्रादि गौण आत्म्यासच गृहादिकांचें रक्षण करावयास सांगेल हें उघड आहे.

कारण मरणकाल समीप असल्यामुळें त्या कृत्यांस आपण अयोग्य आहों असें निश्चयपूर्वक समजलेलें असतें; आणि त्यामुळें तो आपल्या पुत्रासच गृहकृत्यामध्यें नियुक्त करितो. ॥४५॥

-ह्याप्रमाणें गौण आत्म्याचें प्राधान्य केव्हां असतें तें सांगून आतां मिथ्या आत्म्याचें प्राधान्य केव्हां असतें तें सांगतात -

कृशोऽहं पुष्टिमाप्स्यामीत्यादौदेहात्मतोचिता ।
न पुत्रं विनियुंक्तेऽत्र पुष्टिहेत्वन्नभक्षणे ॥४६

अन्वयार्थ - ['अहं कृशः अस्मि पुष्टिं आप्स्यामि' इत्यादौ देहात्मता उचिता--] 'मी कृश झालों आहें. यास्तव अन्नभक्षणादि उपायांनीं पुष्टि मिळवीन, पुष्ट होईन' इत्यादि व्यवहारांत देहाचें आत्मत्वच उचित आहे; [अत्र पुष्टिहेत्वन्नभक्षणे पुत्रं न विनियुक्ते-] कारण पुष्टीस कारण होणाऱ्या अन्नादिकांच्या भक्षणासाठीं पुत्राची योजना कोणीहि करीत नाहीं.

प्रकाश:- 'मी अलिकडे फार वाळलों आहें यास्तव कांहीं तरी शक्तिवर्धक औषध घेऊन मला आतां पुष्ट झालें पाहिजें' असें एकादा रोगी म्हणतो. या स्थळीं मी व मला या शब्दांनीं कोणत्या आत्म्याचें ग्रहण करितां येणें शक्य आहे ? पुत्रादि गौण आत्म्याचें तर येथें कांहीं प्रयोजनच नाहीं. कारण मी कृश झालों आहें म्हणून माझ्या पुत्रानें औषध खावें असें शुद्धीवर असलेला कोणीहि म्हणणार नाहीं. अर्थात् या स्थळीं देहरूपी मिथ्या आत्म्याचेंच ग्रहण करणें योग्य आहे. कारण कृश होणें, पुष्ट होणें, हे धर्म देहाचेच आहेत, हें सर्वांस ठाऊक आहे. ॥४६॥

- तसेंच -

तपसा स्वर्गमेष्यामीत्यादौ कर्त्रात्मतोचिता ।
अनपेक्ष्य वपुर्भोगं चरेत्कृच्छ्रादिकं ततः ॥४७

अन्वयार्थ --[तपसा अहं स्वर्गं एष्यामि इत्यादौ कर्त्रात्मता उचिता--] 'तपाच्या योगानें मी स्वर्गास जाईन' इत्यादि व्यवहारसमर्थी कर्ता जो जीवविज्ञानमय त्यासच आत्मत्व असणें युक्त आहे. देहादिकाला नाहीं. [ततः वपुर्भोगं अनपेक्ष्य कृच्छ्रादिकं चरेत्]म्हणूनच शरीरभोगाची अपेक्षा न करितां पुरुष कृच्छ्रादि तप करितो.

प्रकाश:- ज्याला स्वर्गसुखाची इच्छा असते, तो 'मी कष्टतर तप करून स्वर्ग मिळवीन' असें म्हणतो व त्याकरितां अभ्यंगस्नान, चंदनाच्या उट्या, सुवासिक पुष्पांच्या माळा, दागिने, उत्तम वस्त्रें, स्त्रिया इत्यादि सर्व ऐहिक भोग सोडून कृच्छ्र, चांद्रायणादिकांच्या योगानें शरीरास कृश करून सोडितो. अशा प्रसंगीं देहात्मता ग्रहण करितां येत नाहीं. कारण देह हाच आत्मा आहे असें एकदा मानल्यावर त्यास कृश करून सोडण्याचें कोणासहि धैर्य होणार नाहीं. तस्मात् येथें विज्ञानमय जीवच आत्मा होतो. ॥४७॥

- त्याचप्रमाणें -

मोक्ष्येऽहमित्यत्र युक्तं चिदात्मत्वं तदा पुमान् ।
तद्वेत्ति गुरुशास्त्राभ्यां न तु किंचिच्चिकीर्षति ॥४८

अन्वयार्थ - [यदा पुमान् 'अहं मोक्ष्ये' इति मतिं करोति-] जेव्हां पुरुष 'मी शमादिकांना संपादन करून मुक्त होईन' अशी इच्छा करितो [तदा गुरुशास्त्राभ्यां तत् वेत्ति-] तेव्हां आचार्योपदेश व वाक्यार्थविचार यांपासून उत्पन्न झालेल्या अपरोक्ष ज्ञानानें 'मी गौण किंवा मिथ्या आत्मा नव्हे, तर मी सच्चिदानंद ब्रह्म आहें,' असें चिदात्म्याला जाणतो. [अत्र चिदात्मत्वं युक्तं--] अशा प्रसंगीं त्याचें चिदात्मत्वच युक्त आहे. कारण 'सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म' 'विज्ञानं आनन्दं ब्रह्म' 'अनन्तरोऽबाह्यः कृत्स्नः प्रज्ञानघन एव' इत्यादि श्रुति याविषयीं प्रमाण आहेत. [तु किंचित् न चिकीर्षति-] पण तो कांहीं करण्याची इच्छा करीत नाहीं.

प्रकाश:- मी या जन्ममरणपरंपरेंतून सुटून जाईन असें जेव्हां मनुष्य म्हणतो तेव्हां चैतन्यास आत्मा

म्हणणें युक्त आहे. कारण जीव, देह किंवा पुत्र यांतील कोणीहि मुक्त होणें शक्य नाहीं. पुरुषास चैतन्यरूप साक्षीच आत्मा आहे असें जेव्हां गुरूंचा उपदेश व शास्त्र यांवरून समजतें, तेव्हां आत्मा अकर्ता, अभोक्ता, नित्य, एक, अद्वितीय आहे, असा त्याचा निश्चय झाल्यामुळें तो कोणतीहि क्रिया करण्याची इच्छा करीत नाहीं. ॥४८॥

-याप्रमाणें या त्रिविध आत्म्याचें निरनिराळ्या व्यवहारांत व्यवस्थेनें प्राधान्य असतें, याविषयीं दृष्टान्त-

विप्रक्षत्रादयो यद्वद्बृहस्पतिसवादिषु ।
व्यवस्थितास्तथा गौणमिथ्यामुख्या यथो-
चितम् ॥४९

अन्वयार्थ - [विप्रक्षत्रादय: बृहस्पतिसवादिषु यद्वत् व्यवस्थिता:-] बृहस्पति- सवादि यज्ञांमध्यें ब्राह्मण-क्षत्रियादिक जसे अधिकारी असतात, [तथा गौणमिथ्यामुख्या: आत्मान: यथोचितं व्यवस्थिता:-] त्याचप्रमाणें गौणात्मा, मिथ्यात्मा व मुख्यात्मा यांचें आपापल्या योग्यतेप्रमाणें प्राधान्य असतें.

प्रकाश:- ब्राह्मणानेंच बृहस्पतिसव करावा, राजानें राजसूय करावा व वैश्यानेंच वैश्यस्तोम करावा, इत्यादि वैदिक वाक्यांवरून ब्राह्मणादिकांचा बृहस्पतिसवादि यज्ञांमध्यें अधिकार आहे, हें जसें ठरतें, तसें योग्यतेप्रमाणें गौणात्मा इत्यादि तिन्ही आत्म्याचें प्राधान्य असतें, असें समजावें. प्राधान्य म्हणजे पूर्वी त्रेचाळीसाव्या श्लोकांत सांगितलेलें शेषित्व होय. यासच अंगित्व असेंहि म्हणतात. ॥४९॥

- तात्पर्य -

तत्र तत्रोचिते प्रीतिरात्मन्येवातिशायिनी ।
अनात्मनि तु तच्छेषे प्रीतिरन्यत्र नोभयम् ॥५०

अन्वयार्थ - [तत्र तत्र उचिते आत्मनि एव अतिशायिनी प्रीति:-] ज्या व्यवहारांत जो जो आत्मा उचित असतो त्या व्यवहारांत उचित म्ह० उपयोगी असल्यामुळें प्रधानभूत अशा आत्म्यामध्येंच अतिशय प्रीति असते; [तच्छेषे अनात्मनि तु प्रीति:-] त्या आत्म्याच्या शेषभूत अनात्म्यामध्यें- आत्मभिन्न वस्तूमध्यें सामान्य प्रीति असते. निरतिशय प्रेम नसतें. [अन्यत्र उभयं अपि न अस्ति-]- आणि आत्मा व आत्मशेष यांहून भिन्न वस्तूंवर दोन्ही प्रकारचें प्रेम नसतें.

प्रकाश:- वर सांगितल्याप्रमाणें, ज्या ज्या व्यवहारांत जो जो आत्मा होणें उचित असते, त्याच्या त्याच्या ठायींच प्राण्याची अतिशय प्रीति असते; म्हणजे गृहरक्षणादि प्रसंगीं गौणात्मा अति प्रिय असतो, पुष्टीची इच्छा असतांना मिथ्यात्मा अति आवडतो व मोक्षाची जेव्हां इच्छा असते, तेव्हां चिदात्म्यावर अति प्रेम असतें. अर्थात् त्या त्या समयीं त्यांचें त्याचेंच प्राधान्य असतें. व जेव्हां ज्या आत्म्यावर अति प्रेम असतें तेव्हां त्याच्या शेषभूत पदार्थांवर सामान्य प्रेम असतें म्हणजे ज्या वेळीं पुत्रावर अति प्रेम त्या वेळीं त्याच्या मित्रावर किंवा स्त्रीवर सामान्य प्रेम, ज्या वेळीं देहावर किंवा जीवावर अति प्रेम त्या वेळीं पुष्टिवर्धक पदार्थ व कृच्छ्रादि तप यांवर सामान्य प्रेम व ज्या वेळीं चिदात्म्यावर अति प्रेम त्या वेळीं शास्त्र व गुरु यांवर सामान्य प्रेम असतें. पण आत्मा व आत्म्याचा शेष यांतील एकाहि कोटींत ज्या पदार्थांची गणना होत नाहीं, त्याच्यावर मनुष्याचें मुळींच प्रेम नसतें. ॥५०॥

-पूर्व श्लोकांतील 'अन्यत्र-' शब्दाच्या अर्थांचा अवान्तर भेद सांगतात -

उपेक्ष्यं द्वेष्यमित्यन्यद्द्वेधा मार्गतृणादिकम् ।
उपेक्ष्यं व्याघ्रसर्पादि द्वेष्यमेवं चतुर्विधम् ॥५१

अन्वयार्थ - [उपेक्ष्यं द्वेष्यं च इति अन्यत् द्वेधा-] उपेक्षा करण्यास योग्य व द्वेष करण्यास योग्य असें 'अन्यत्' दोन प्रकारचें आहे.

[मार्गतृणादिकं उपेक्ष्यम्-] मार्गांतील तृण, दगड इत्यादि पदार्थ उपेक्ष्य आहेत [व्याघ्र-सर्पादि द्वेष्यम्-] आपल्याला उपद्रव देणारे व्याघ्र-सर्पादि द्वेष्य आहेत. [एवं पदार्थजातं चतुर्विधं अस्ति-] याप्रमाणें सर्व पदार्थजात चार प्रकारचें आहे.

प्रकाश:- अन्यत्र या शब्दांत अन्य हा मुख्य शब्द आहे. व अन्याचे उपेक्ष्य व द्वेष्य असे दोन प्रकार आहेत. रस्त्यांतील गवत, दगड, माती इत्यादि निरुपयोगी पदार्थ उपेक्षा करण्यास योग्य असतात. व्याघ्र, सर्प, विंचू इत्यादि दुःख देणारे पदार्थ द्वेषास पात्र असतात. आणि ह्याप्रमाणें जगातील सर्व पदार्थ या चार कोटींत येतात. ॥५१॥

- चतुर्विधत्वच स्पष्ट करून सांगतात -

आत्मा शेष उपेक्ष्यं च द्वेष्यं चेति चतुर्ष्वपि ।
न व्यक्तिनियम: किं तु तत्तत्कार्यात्तथा तथा ॥५२

अन्वयार्थ - [आत्मा, शेष: उपेक्ष्यं च द्वेष्यं इति चतुर्षु अपि व्यक्तिनियम: न अस्ति--] आत्मा, शेष, उपेक्ष्य व द्वेष्य या चारहि प्रकारांमध्यें व्यक्तिनियम नाहीं; [किं तु तत्तत्कार्यात् तथा तथा भवति-] तर त्या त्या उपकारादि कार्यावरून तो तो पदार्थ प्रिय अप्रिय वगैरे होतो.

प्रकाश:- अमुक एक पदार्थ द्वेष्यच आहे, किंवा उपेक्ष्य आहे, किंवा सुखाचें अंग आहे, असा अबाधित नियम करितां येत नाहीं; कारण ज्याचें ज्याचें जसें जसें कार्य होत असेल, त्या त्याप्रमाणें तो पदार्थ द्वेष्य उपेक्ष्य किंवा शेष होत असतो. ॥५२॥

-सर्वत्र अनियम दाखविण्यासाठीं उदाहरण देतात-

स्याद्व्याघ्र: संमुखो द्वेष्यो ह्युपेक्ष्यस्तु पराङ्मुख: ।
लालनादनुकूलश्चेद्विनोदायेति शेषताम् ॥५३

अन्वयार्थ - [व्याघ्र: संमुख: द्वेष्य: स्यात्-] वाघ खाण्यासाठीं जेव्हां अंगावर चालून येतो तेव्हां द्वेष्य होतो. [तु पराङ्मुख: हि उपेक्ष्य: भवति-] पण तोच दुसरीकडे कोठें जात असला तर उपेक्ष्य होतो. [तथा लालनात् अनुकूल: चेत् विनोदाय भवति इति शेषतां भजते -] बरें लाड वगैरे केल्यामुळें जर तो अनुकूल झाला, तर विनोदाला कारण होतो व त्यामुळें तो शेषतेस पात्र होतो. म्ह० उपकारक झाल्यामुळें प्रिय वाटतो.

प्रकाश:- व्याघ्रासारखा क्रूर प्राणी अंगावर धांवून आल्यास त्याच्याविषयीं कोणाच्याहि मनांत द्वेष उत्पन्न होणें साहजिक आहे. बरें; तो दुसरीकडेच कोठें जात असतांना कोणाच्या दृष्टीस पडला तर कोणीहि झाला तरी त्याच्या वाटेस जाणार नाहीं, हेंहि उघड आहे. तसेंच त्याचें उत्तम प्रकारें पालनपोषण केल्यामुळें जर तो वश झाला, तर स्वत:च्या व लोकांच्याहि करमणुकीस तो कारण होत असल्यामुळें सुखाचें अंग होतो. जनावरांची कसरत ज्यांनीं पाहिली असेल त्यांस प्रस्तुत गोष्ट समजेल. यावरून बऱ्याच कालापूर्वीहि व्याघ्राचे खेळ होत असत असें अनुमान होतें. सारांश, कोणताहि पदार्थ केवळ द्वेष्य किंवा केवळ उपेक्ष्य किंवा केवळ सुखसाधनच असेल असा नियम संभवत नाहीं. ॥५३॥

-'अहोपण, एकाच वस्तूचे जर प्रियत्वादि तीन धर्म मानले तर व्यवहाराची व्यवस्था कशी लागणार ?' उत्तर--

व्यक्तीनां नियमो मा भूल्लक्षणात्तु व्यवस्थिति: ।
आनुकूल्यं प्रातिकूल्यं द्वयाभावश्च लक्षणम् ॥५४

अन्वयार्थ - [व्यक्तीनां नियम: मा भूत् तु लक्षणात् व्यवस्थिति: स्यात्-] व्यक्तींचा नियम नसो, पण लक्षणामुळें व्यवस्था होऊं शकते. [आनुकूल्यं प्रातिकूल्यं च द्वयाभाव: लक्षणं अस्ति-] अनुकूलता, प्रतिकूलता व त्या दोहोंचा अभाव हें लक्षण आहे.

प्रकाश:- व्यक्ति कोणत्या प्रकारची आहे हें जरी नियमानें सांगतां येत नसलें तरी त्या त्या लक्षणावरून

व्यवहार होऊं शकेल. आतां प्रिय, उपेक्ष्य व द्वेष्य यांचें लक्षण काय म्हणून जर म्हणशील तर सांगतों. अनुकूलपणा हें प्रियाचें लक्षण, प्रतिकूलपणा हें द्वेष्याचें लक्षण व अनुकूलता आणि प्रतिकूलता यांतील कांहींच नसणें हें उपेक्ष्याचें लक्षण होय. ॥५४॥

-येथवर उपपादन केलेल्या अर्थाचेंच संक्षेपत: कथन-

आत्मा प्रेयान् प्रिय: शेषो द्वेषोपेक्षे तदन्ययो: ।
इति व्यवस्थितो लोको याज्ञवल्क्यमतं च तत् ॥५५

अन्वयार्थ - [आत्मा प्रेयान् शेष: प्रिय: तदन्ययो: द्वेषोपेक्षे इति लोक: व्यवस्थित:-] आत्मा प्रत्यगानंद अति प्रिय, शेषभूत-उपकारक पदार्थ नुसता प्रिय, त्याहून अन्य म्ह० व्याघ्रादि व तृणादि पदार्थ द्वेष्य व उपेक्ष्य, अशा प्रकारें हा लोक व्यवस्थित आहे [च तत् याज्ञवल्क्यमतम्-] व हें आत्म्यादिकांचें प्रियतमत्वादिक याज्ञवल्क्यासहि मान्य आहे.

प्रकाश:- प्रत्यक् आनंदरूप आत्मा अतिशय प्रिय आहे. सुखादिकांस साधन होणारे पदार्थ नुस्ते प्रिय आहेत. व्याघ्रादि दु:खदायी पदार्थ द्वेषास पात्र होत असतात. व तृणादि निरुपयोगी पदार्थ उपेक्षा करण्यास योग्य होत. सारांश या चार प्रकारें सर्व लोक व्यवस्थित झाला आहे. शिवाय हा अर्थ याज्ञवल्क्यांसहि मान्य आहे. ॥५५॥

-केवल मैत्रेयीब्राह्मणांच आत्म्याचें प्रियतमत्व सांगितलें आहे, असें नाहीं तर पुरुषविधब्राह्मणांतहि तसेंच सांगितलें आहे, अशा आशयानें त्या वाक्यार्थाचा संक्षेपत: अनुवाद -

अन्यत्रापि श्रुति:प्राह पुत्राद्वित्तात्तथान्यत: ।
सर्वस्मादांतरं तत्त्वं तदेतत्प्रेय इष्यताम् ॥५६

अन्वयार्थ - [पुत्रात् वित्तात् तथा अन्यत: सर्वस्मात् आंतरं यत् तत्त्वं अस्ति-] 'तदेतत्प्रेय: पुत्रात्प्रेयो वित्तात्प्रेय:' - बृ. भा. १.४.८. या वाक्यानें पुत्राहून, वित्ताहून व त्याप्रमाणें दुसऱ्या सर्वांहून आंत असणारें जें आत्मतत्त्व आहे, [तत् एतत् प्रेय: इष्यतां इति अन्यत्र अपि श्रुति: प्राह-] तें हें अतिप्रिय आहे असें समजावें, असें अन्यत्रहि श्रुति सांगते.

प्रकाश:- 'आत्मतत्त्व पुत्रादि सर्व पदार्थांहून आंत राहणारें आहे. आंत म्हणजे सर्व कार्यकरणरूप समूहाच्या पलीकडे असें समजावें. व हें तत्त्व अतिशय प्रिय आहे. अशी भावना करावी' इत्यादि प्रकारें दुसऱ्याहि अनेक श्रुति सांगत आहेत. ॥५६॥

- तात्पर्य -

श्रौत्या विचारदृष्ट्यायं साक्ष्येवात्मा न चेतर: ।
कोशान्पंच विविच्यांतर्वस्तुदृष्टिर्विचारणा ॥५७

अन्वयार्थ - [श्रौत्या विचारदृष्ट्या अयं साक्षी एव आत्मा न च इतर:-] श्रुत्यर्थपर्यालोचनरूप विचारदृष्टीनें हा साक्षीच आत्मा आहे, पुत्रादि इतर कोणी नव्हे. विचारदृष्टीचें स्वरूप- [पंच कोशान् विविच्य अंतर्वस्तुदृष्टि: विचारणा-] अन्नमयादि पंच कोशांचें तैत्तिरीयांत सांगितल्याप्रमाणें विवेचन करून-आत्म्यापासून त्यांना पृथक् करून त्या सर्वांच्या आंत असलेल्या आत्म्याचा अनुभव घेणें हीच विचारणा होय.

प्रकाश:- एवढा वेळपर्यंत सांगितलेल्या विचारसरणीनें विचार केला असतां हा साक्षीच खरा आत्मा आहे, पुत्रादि दुसरा कोणीहि नव्हे, असा निश्चय होतो. आतां विचार कसा करावा म्हणून म्हणाल तर सांगतों. अन्नमयादि पांच कोशांहून आत्मा भिन्न आहे असा निश्चय करून त्याच्याकडेच दृष्टि लावणें हाच विचार होय ॥५७॥

- अन्त:स्थित वस्तूचा दर्शनप्रकारच सांगतात -

जागरस्वप्नसुप्तीनामागमापायभासनम् ।
यतो भवत्यसावात्मा स्वप्रकाशचिदात्मक: ॥५८

अन्वयार्थ - [जागरस्वप्नसुप्तीनां आगमापाय-भासनं यत: भवति-] जागृति, स्वप्न व सुषुप्ति यांच्या उत्पत्तीचें व नाशाचें भान ज्या नित्यचैतन्यरूप साक्षीमुळें होतें, [असौ स्वप्रकाशचिदात्मक: आत्मा-] तो स्वप्रकाश चिद्रूप आत्मा होय.

प्रकाश:- एका अवस्थेचा अंत व दुसरीचा उदय यांचें ज्ञान ज्या महात्म्यामुळें होतें तोच स्वयंज्योति, चैतन्यरूप, सर्व कारणांचें कारण, नित्य, निरंजन, व साक्षी आत्मा आहे. ॥५८॥

-या संक्षेपत: सांगितलेल्या श्रुत्यर्थाचाच विस्तार -

शेषा: प्राणादिवित्तांता आसन्नास्तारतम्यत: ।
प्रीतिस्तथा तारतम्यात्तेषु सर्वेषु वीक्ष्यते ॥५९

अन्वयार्थ - [प्राणादिवित्तान्ता: शेषा: तारतम्यत: आसन्ना:-] साक्षिव्यतिरिक्त प्राणापासून वित्तापर्यंत शेष आत्मोपकारक पदार्थ तारतम्यानें कमी अधिक प्रमाणानें आत्म्याजवळ असतात, [तथा तेषु सर्वेषु प्रीति: तारतम्यात् वीक्ष्यते-] आणि जशा तारतम्यानें त्यांना सामीप्य असतें तशीच त्या प्राणादिकांवर न्यूनाधिक प्रीति दिसते.

प्रकाश:- साक्षीहून भिन्न असे प्राणापासून वित्तापर्यंत जेवढे म्हणून शेषरूप पदार्थ आहेत, ते सर्व जसे जसे आत्म्याजवळ असतात तशी तशी त्यांच्यावर अधिक प्रीति असते. म्हणजे आत्म्याच्या अगदीं जवळ प्राण आहे. यास्तव तो सर्वांत अधिक प्रिय असतो. देह त्यांच्याहून जरा दूर आहे म्हणून तो प्राणांहून कमी प्रिय आहे. तात्पर्य, सर्वत्र असाच क्रम समजावा. ॥५९॥

-प्रीतीचा तारतम्यानें अनुभव कसा येतो तें सांगतात -

वित्तात्पुत्र: प्रिय: पुत्रात्पिंड: पिंडात्तथेंद्रियम् ।
इंद्रियाच्च प्रिय: प्राण: प्राणादात्मा प्रिय: पर: ॥६०

अन्वयार्थ - [वित्तात् पुत्र: प्रिय:, पुत्रात् पिंड: तथा पिंडात् इंद्रियं च इंद्रियात् प्राण: प्रिय: प्राणात् पर: आत्मा प्रिय: अस्ति-] द्रव्याहून पुत्र प्रिय, पुत्राहून पिंड-देह प्रिय, तशींच पिंडाहून इंद्रियें प्रिय, इंद्रियांहून प्राण प्रिय, आणि प्राणाहून श्रेष्ठ आत्मा प्रिय असतो.

प्रकाश:- पिंड म्हणजे देह. तो वित्त व पुत्र यांहून प्रिय आहे. त्याच्याहून आंत असणारीं इंद्रियें व प्राण उत्तरोत्तर प्रिय असतात. साक्षी परमात्मा तर सर्वांहून प्रिय आहे. ॥६०॥

-याप्रमाणें आत्म्याचें प्रियतमत्त्व प्रमाणसिद्ध जरी असलें तरी ज्ञानी व अज्ञानी यांच्या मतभेदाचें निरसन करण्यासाठीं श्रुतीनें त्यांच्या विरोधाचें दिग्दर्शन केलें आहे, असें सांगतात -

एवं स्थिते विवादोऽत्र प्रतिबुद्धविमूढयो: ।
श्रुत्योदाहारि तत्रात्मा प्रेयानित्येव निर्णय: ॥६१

अन्वयार्थ - [एवं स्थिते अत्र प्रतिबुद्धविमूढयो: विवाद: श्रुत्या उदाहारि-] ह्याप्रमाणें आत्म्याचें अति प्रियत्व प्रमाणसिद्ध असतांनाहि त्याविषयीं ज्ञानी व अज्ञानी यांचा वाद श्रुतीनें दाखविला आहे. [तत्र आत्मा प्रेयान् इति एव निर्णय:-] पण त्यांत आत्मा अतिप्रिय आहे, हाच निर्णय होय.

प्रकाश:- आत्मा अति प्रिय आहे, ही गोष्ट जरी अनेक प्रमाणांनीं सिद्ध होत असली, तरी ज्ञानी व अज्ञानी यांच्यामध्यें या आत्म्याविषयीं नेहमीं वाद चालतो. व श्रुतीने त्याचाच येथें निर्देश केलेला आहे. यावरून आत्मा अति प्रिय आहे हाच त्या वादाचा निर्णय होय; असे समजावें. ॥६१

- आतां ज्ञानी व अज्ञानीं यांचा विरोधच दाखवितात -

साक्ष्येव दृश्यादन्यस्मात्प्रेयानित्याह तत्त्ववित् ।
प्रेयान्पुत्रादिरेवेमं भोक्तुं साक्षीति मूढधी: ॥६२

अन्वयार्थ - [तत्त्ववित् साक्षी एव अन्यस्मात् दृश्यात् प्रेयान् इति आह-] तत्त्वज्ञ साक्षी आत्माच दुसऱ्या सर्व दृश्यांहून अधिक प्रिय आहे, असें म्हणतो. [पुत्रादि: एव प्रेयान् च इमं भोक्तुं साक्षी इति मूढधी: आह-] व पुत्रादिकच अधिक प्रिय आहे व त्याचा भोग घेण्यासाठीं साक्षी आहे, असें मूढ पुरुष म्हणतो.

प्रकाश:- अर्थात् दोघांचीं याप्रमाणें भिन्न भिन्न मतें असल्यामुळें त्यांचा वाद चालतो. ॥६२॥

-आत्मभिन्न वस्तुच प्रिय आहे, असें म्हणणाऱ्या दोन प्रकारच्या वाद्यांना भिन्न भिन्न उत्तर देण्यासाठीं अगोदर दोन प्रकारच्या वाद्यांचाच निर्देश करितात -

आत्मनोऽन्यं प्रियं ब्रूते शिष्यश्च प्रतिवाद्यपि ।
तस्योत्तरं वचो बोधशापौ कुर्यात्तयो: क्रमात् ॥६३

अन्वयार्थ - [शिष्य:च प्रतिवादी अपि आत्मन: अन्यं प्रियं ब्रूते-] शिष्य व प्रतिवादीहि आत्म्याहून अन्य पदार्थ प्रियं आहे असें म्हणतात. [तयो: तस्य उत्तरं वच: क्रमात् बोधशापौ कुर्यात्-] त्यांच्या त्या म्हणण्याचें उत्तररूप वचन क्रमानें बोधरूप व शापरूप करावें.

प्रकाश:- ज्याप्रमाणें प्रतिवादी तत्त्ववेत्त्यास प्रश्न करीत असतो, तसाच उत्तम शिष्यहि आपणांस बोध व्हावा म्हणून गुरूस अनेक वेडेवांकडे प्रश्न करीत असतो. यास्तव तत्त्ववेत्त्यानें असें उत्तर द्यावें कीं, ज्याच्या योगानें शिष्यास बोध होईल व प्रतिवादीस तोच शाप होईल. ॥६३॥

- 'स योऽन्यमात्मन: प्रियं ब्रुवाणं ब्रूयात् प्रियं त्वां रोत्स्यति' हें प्रतिवचनरूप वाक्य अर्थत: पढतात -

प्रियं त्वां रोत्स्यतीत्येवमुत्तरं वक्ति तत्त्ववित् ।
स्वोक्तप्रियस्य दुष्टत्वं शिष्यो वेत्ति विवेकत: ॥६४

अन्वयार्थ - [प्रियं त्वां रोत्स्यति इति एवं तत्त्ववित् उत्तरं वक्ति-] हे शिष्या, किंवा हे वाद्या, 'तुला इष्ट असलेली पुत्रादिरूप वस्तु आपल्या नाशानें तुला रडवील' असें तत्त्ववेत्ता उत्तर देतो. 'पण हें एकच वचन शिष्य व प्रतिवादी या दोघांनाहि प्रत्युत्तर कसें होतें,' अशी शंका घेऊन पुढील साडेचार श्लोकांनीं तें शिष्याला प्रत्युत्तर कसें होतें तें दाखवितात - [तेन शिष्य: स्वोक्तप्रियस्य दुष्टत्वं विवेकत: वेत्ति-] त्या वचनावरून शिष्य आपण सांगितलेली पुत्रादि प्रिय वस्तु दुष्ट आहे असें विवेकद्वारा जाणतो.

प्रकाश:- 'तूं ज्यास आत्मा समजत आहेस व त्यामुळें जो तुला अति प्रिय आहे, त्याचा नाश झाला असतां तुला अति दु:ख होईल. म्हणजे तो खोटा आत्मा आपल्या नाशानें तुला रडवील. असें एकच वाक्य तत्त्वज्ञ पुरुष दोघांस उद्देशून बोलतो, पण त्याचा परिणाम दोघांवर निरनिराळा घडतो. जो शिष्य असतो, त्याची गुरूंच्या वचनावर श्रद्धा असल्यामुळें तो 'या वाक्याचा गूढ अर्थ काय असावा बरें ?' असा विचार करूं लागतो व त्यामुळें 'आपण ज्यास प्रिय समजत आहों तो पुत्रादि गौण आत्मा अनेक दोषयुक्त आहे' असें त्यास समजतें ॥६४

-पुत्रादि प्रिय वस्तूंतील दोषांच्या विचाराचा प्रकार --

अलभ्यमानस्तनय: पितरौ क्लेशयेच्चिरम् ।
लब्धोऽपि गर्भपातेन प्रसवेन च बाधते ॥६५
जातस्य ग्रहरोगादि: कुमारस्य च मूर्खता ।
उपनीतेऽप्यविद्यत्वमनुद्वाहश्च पंडिते ॥६६
यूनश्च परदारादि दारिद्यं च कुटुंबिन: ।
पित्रोर्दु:खस्य नास्त्यांतो धनी चेन्म्रियते तदा ॥६७

अन्वयार्थ - [अलभ्यमान: तनय: पितरौ चिरं क्लेशयेत्-] प्राप्त न होणारा पुत्र माता-पितरांस 'आम्हांला पुत्र नाहीं' म्हणून दीर्घकाल दु:ख देतो. [लब्ध: अपि गर्भपातेन च प्रसवेन बाधते-] गर्भरूपानें प्राप्त झालेलाहि पुत्र गर्भपात व प्रसूति यांच्या योगानें पीडा देतो. [जातस्य कुमारस्य ग्रहरोगादि: च मूर्खता-] उत्पन्न झालेल्या पुत्राची पिशाच्चबाधा, रोग, मूर्खता, हीं दु:ख देतात; [उपनीते अपि अविद्यत्वं-] उपनयन झाल्यावरहि अविद्वत्ता-विद्या न येणें [च पंडिते अनुद्वाह:-] व पंडित होऊनहि विवाह न होणें, हीं दुसरीं दु:खाचीं कारणें आहेत. [च यून: परदारादि-] तरुण झाल्यावर त्याचें परस्त्रीसेवन वगैरे [च कुटुंबिन: दारिद्यं-] व कुटुंब्याचें दारिद्य; [धनी चेत् तर्हि यदा म्रियते तदा-] बरें तो पुत्र धनवान् असल्यास जेव्हां मरतो, तेव्हां [एवं पित्रो: दु:खस्य अंत:नास्ति-] याप्रमाणें आई बापांच्या दु:खाला अंत नसतो.

प्रकाश:- अगोदर अभाग्यांस पुत्र होत नाहीं, म्हणून दु:ख, पुढें स्त्री गरोदर होऊन जरीं गर्भपात झाला तरी दु:ख; मूल जेव्हां जन्मास येतें तेव्हां दु:ख, जन्मानंतर रोगादिकांच्या योगानें त्यास पीडा झाल्यास दु:ख, तें मूर्ख निपजल्यास दु:ख; मुंज केल्यावर त्याला विद्या न असल्यास दु:ख, जरी विद्या आली, तरी दारिद्र्यादि दुसऱ्या कांहीं कारणांमुळें विवाह न होणें हें दु;ख, विवाह न झाल्यामुळें तारुण्यावस्थेंत जर त्यानें परस्त्रीगमन किंवा वेश्यागमन केलें तर अपकीर्ती, असाध्य रोग यांच्यामुळें दु:ख; कुटुंब दरिद्री असल्यामुळें आपल्या पुत्रास सुख होत नाहीं म्हणून दु:ख; आणि जर कदाचित् पिता श्रीमंत असला, तर निदान पुत्र अकालीं मरण पावल्यास दु:ख ! सारांश, सर्व अवस्थेंत पुत्र आईबापांस दु:ख देण्यास कारण होत असतो. या स्थळीं आणखी दुसऱ्या दु:खांची गणना केली नाहीं. नाहींपेक्षां प्रस्तुत ग्रंथाचा केवढा तरी विस्तार झाला असता !! आतां प्रसूति इत्यादि कालीं पित्यास प्रत्यक्ष दु:ख होत नाहीं हें जरी खरें आहे, तरी संसर्गामुळें स्त्रीच्या दु:खानें दु:खी होणारें बहुतेक सर्व पति असतात, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. ॥६५॥६६॥६७

-पुत्रांतील दोषांचें हें वर्णन स्त्रीप्रभृति सर्व विषयदोषांच्या उपलक्षणार्थ आहे, असें सांगतात -

एवं विविच्य पुत्रादौ प्रीतिं त्यक्त्वा निजात्मनि ।
निश्चित्य परमां प्रीतिं वीक्षते तमहर्निशम् ॥६८

अन्वयार्थ - [एवं विविच्य-] ह्याप्रमाणें पुत्र, स्त्री इत्यादि सर्व विषयांविषयीं विवेचन करून - त्यांतील विद्यमान दोष जाणून [पुत्रादौ प्रीतिं त्यक्त्वा-] त्या पुत्रादिकांवरील प्रीति सोडून [निजात्मनि परमां प्रीतिं निश्चित्य तं अहर्निशं वीक्षते-] निजात्म्यांतील प्रत्यग्रूप साक्षीवरील निरतिशय प्रीतीचा निश्चय करून त्या कूटस्थ प्रत्यगात्म्यालाच तो सतत पहातो-त्याचेंच निरंतर अनुसंधान करितो.

प्रकाश:- प्रस्तुत विचारानंतर पुत्रादि सर्व अनात्मरूप विषय दु:खरूप आहेत, त्यांस परम सुख समजणें ही मोठी चूक आहे, इत्यादि प्रकारें ज्ञान झालें असतां अर्थात् तो शिष्य विषयप्रीति सोडतो. व साक्षी आत्माच नित्य व निरतिशय प्रिय आहे, असा त्याचा निश्चय होतो आणि त्यामुळें तो सतत आत्मानुसंधान करीत राहतो. ॥६८॥

- आतां पूर्वोक्त उत्तर प्रतिवाद्याला शापरूप कसें होतें तें सांगतात -

आग्रहाद्ब्रह्मविद् द्वेषादपि पक्षममुंचत: ।
वादिनो नरक: प्रोक्तो दोषश्च बहुयोनिषु ॥६९

अन्वयार्थ -[आग्रहात्च ब्रह्मविद्द्वेषात् अपि-] पण 'मी म्हटलेलें पुत्रादिकांचें प्रियत्व कधीं सोडणार नाहीं,' अशा आग्रहानें व 'या ब्रह्मवेत्त्यानें

जें सांगितलें आहे तें मी खोडून काढीन,' अशा स्वरूपाच्या ब्रह्मवेत्त्याविषयींच्या द्वेषानेंहि [पक्षं अमुंचत: वादिन:-] पुत्रादिकांनाच प्रियत्व आहे, अशा प्रकारचा आपला पक्ष न सोडणाऱ्या प्रतिवाद्याला [नरक: च बहुयोनिषु दोष: प्रोक्त: अस्ति-] नरकाची प्राप्ति व पशुपक्ष्यादि अनेक तिर्यग्योनींमध्यें पुत्र-भार्यादि इष्टवियोग व अनिष्टप्राप्तिरूप दोष 'प्रियं त्वां रोत्स्यति' असें बोलणाऱ्या ज्ञान्यानें सांगितला आहे.

प्रकाश:- 'मी म्हणतों तेंच खरें.' असा आग्रह धरून किंवा - या ब्रह्मवेत्त्याचें म्हणणें मी खोटें करीन, असा ब्रह्मज्ञ पुरुषाशीं द्वेष करून जो आपला खोटा पक्षहि सोडीत नाहीं, तो वादी नरकांत पडतो. दीर्घकाल नरकवास भोगून तरी त्याची सुटका होते असें नाहीं. तर पुढेंहि अनेक जन्म त्यास पुत्रभार्या इत्यादि प्रिय वस्तूंच्या नाशामुळें दु:ख भोगावें लागतें, अशा प्रकारें पूर्वोक्त प्रत्युत्तरच वाद्यास शापरूप होतें. ॥६९॥

-'पण एकाच वाक्याचे शिष्य व वादी यांच्या ठिकाणीं असें विरुद्ध दोन परिणाम कसे होऊं शकतील ?' उत्तर -

ब्रह्मविद्ब्रह्मरूपत्वादीश्वरस्तेन वर्णितम् ।
यद्यत्तत्तत्तथैव स्यात्तच्छिष्यप्रतिवादिनो: ॥७०

अन्वयार्थ - [ब्रह्मरूपत्वात् ब्रह्मवित् ईश्वर:-] ब्रह्मरूपत्वामुळें ब्रह्मज्ञ ईश्वरच आहे. [अत: तेन यत् यत् वर्णितं तत् तत् तच्छिष्यप्रतिवादिनो: तथा एव स्यात्-] यास्तव त्यानें जें जें म्हटलेलें असतें तें तें त्याच्या शिष्यास व प्रतिवाद्यास तसेंच होतें.

प्रकाश:- जो ब्रह्मास जाणतो, तो ब्रह्मरूपच होतो असें श्रुतिवचन आहे. यास्तव ब्रह्मज्ञ पुरुष ईश्वरच आहे, यांत कांहीं संशय नाहीं. अर्थात् तो शिष्यास किंवा वाद्यास उद्देशून जें जें कांहीं इष्ट किंवा अनिष्ट म्हणेल, तें तें सर्व तसेंच होईल. कारण ब्रह्मानुभवामुळें त्याची वाणी सत्य होत असते. ॥७०॥

- व्यतिरेकमुखानें सांगितलेल्या अर्थाचेंच अन्वयमुखानें प्रतिपादन करणारें 'आत्मानमेव प्रियमुपासीत०' हें पुढील वाक्य अर्थत: पढतात -

यस्तु साक्षिणमात्मानं सेवते प्रियमुत्तमम् ।
तस्य प्रेयानसावात्मा न नश्यति कदाचन ॥७१

अन्वयार्थ - [तु य: साक्षिणं आत्मानं एव उत्तमं प्रियं सेवते-] पण याच्या उलट म्ह० अनात्म्याला प्रिय म्हणणाऱ्या वाद्याहून निराळ्या प्रकारचा जो शिष्य साक्षी आत्म्यालाच निरतिशय प्रेमास्पद मानून त्याची सेवा, त्याचें सतत स्मरण करितो [तस्य असौ प्रेयान् आत्मा कदाचन न नश्यति-] त्याचा हा अतिशय प्रिय आत्मा कधींहि नष्ट होत नाहीं.

प्रकाश:- पुत्रादि इतर सर्व गौण व मिथ्या आत्मे आहेत आणि कूटस्थ व सर्वांतर्यामी आत्माच मुख्य आत्मा आहे. अर्थात् तोच निरतिशय प्रिय आहे. व अशा भावनेनें जो कोणी श्रद्धालु सतत आत्मानुसंधान करितो, त्यास तो अति प्रिय आत्मा सर्वदा आनंदरूपानें भासत असतो. म्हणजे वाद्याप्रमाणें त्याच्या आत्म्याचा अधोगतिरूप नाश होत नाहीं. ॥७१॥

-ह्याप्रमाणें आत्मा परमप्रेमास्पद आहे असें श्रुति, युक्ति व अनुभव यांच्या द्वारा सिद्ध करून आतां त्याचें फल सांगतात --

परप्रेमास्पदत्वेन परमानंदरूपता ।
सुखवृद्धि: प्रीतिवृद्धौ सार्वभौमादिषु श्रुता ॥७२

अन्वयार्थ - [परप्रेमास्पदत्वेन परमानंदरूपता-] आत्मा परम प्रेमास्पद असल्यामुळें त्याच्या परमानंदतेची सिद्धि होते. [सार्वभौमादिषु प्रीतिवृद्धौ सुखवृद्धि: श्रुता-] सार्वभौमादिकांमध्यें जेथें जेथें प्रीतीची वृद्धि होत असतें, तेथें तेथें सुखाचीहि वृद्धि होते, असें श्रुतीनें सांगितलें आहे.

प्रकाश:- आत्मा परमानंदरूप आहे. कारण तो परम प्रेमाचें स्थान आहे. जो जो पदार्थ परमप्रेमाचें स्थान नसतो, तो तो परमानंदरूपहि नसतो. जसा: दगड किंवा वृक्ष. तैत्तिरीय (२-८) बृहदारण्यक (४.३.३३)

इत्यादि उपनिषदांत ज्या ज्या पदार्थाविषयीं प्रीति वाढते, तो तो पदार्थ अधिक सुख देणारा असतो, असें अनेक दृष्टांत देऊन ठरविलें आहे. ॥७२॥

- आत्म्याच्या परमानंदतेविषयीं वादी शंका घेतो-

चैतन्यवत्सुखं चास्य स्वभावश्चेच्चिदात्मनः ।
धीवृत्तिष्वनुवर्तेत सर्वास्वपि चितिर्यथा ॥७३

अन्वयार्थ - [अस्य चिदात्मनः चैतन्यवत् सुखं च स्वभावः चेत्-] या चिदात्म्याचा चैतन्याप्रमाणेंच सुख हा जर स्वभाव असता [तर्हि यथा चितिः तथा तत् अपि सर्वासु धीवृत्तिषु अनुवर्तेत-] तर चैतन्याप्रमाणेंच तेंसुखहि सर्व बुद्धिवृत्तीमध्यें अनुवृत्त झालें असतें.

प्रकाश:- चिदात्मा सुखरूप आहे असें म्हणणें युक्त नव्हे. कारण तो सुखरूप जर असता, तर त्याचें चैतन्य जसें सर्व वृत्तीमध्यें अनुवृत्त होतें, तसेंच सुखहि अनुवृत्त झालें असतें. पण तसें कधींच होत नाहीं. कारण सर्व वृत्तीमध्यें सुखाची जर अनुवृत्ति झाली असती तर दुःखाचा कोणासच प्रत्यय आला नसता. शिवाय चैतन्याप्रमाणें प्रत्येक वृत्तींत त्याची प्रतीति आली असती. ॥७३॥

-चिद् व आनंद ह्या दोहोंनाहि जरी आत्मरूपत्व असलें तरी वृत्तीमध्यें एका चित्‌चीच अनुवृत्ति होते, आनंदाची होत नाहीं, असें दृष्टान्ताच्या आधारानें सांगतात

मैवमुष्णप्रकाशात्मा दीपस्तस्य प्रभा गृहे ।
व्याप्नोति नोष्णता तद्वच्चितेरेवानुवर्तनम् ॥७४

अन्वयार्थ - [मा एवम्-] असें म्हणूं नको. [दीपः उष्णप्रकाशात्मा अस्ति-] कारण दीप जरी उष्ण व प्रकाशरूप आहे, [तथापि तस्य प्रभा गृहे व्याप्नोति उष्णता तु न -] तरी त्याची प्रभाच घरांत पसरते, उष्णता कधींच पसरत नाहीं. [तद्वत् चितेः एव अनुवर्तनम्-] त्याप्रमाणें आत्म्याचें चैतन्यच वृत्तीमध्यें अनुवृत्त होतें, सुख अनुवृत्त होत नाहीं.

प्रकाश:- घरांत लाविलेल्या दिव्यामध्यें उष्णता व प्रभा हे दोन्ही धर्म असतात.पण यांतील उष्णता दिव्यास सोडून दूर जात नाहीं. प्रभा मात्र सर्व घरभर पसरलेली असते, हा दृष्टांत आहे, आणि याप्रमाणेंच आत्म्याचें चैतन्य मात्र वृत्तींमध्यें अनुवृत्त होतें. सुख अनुवृत्त होत नाहीं, म्हणजे कोणत्याहि पदार्थाचें सर्व धर्म सर्व स्थळीं सारखें कार्य करतीलच, असा कांहीं नियम नाहीं. ॥७४॥

-'अहोपण, चित् व आनंद यांचा जर अभेद आहे तर चिद्‌ला अभिव्यक्त करणाऱ्या वृत्तींत आनंदाचीहि अभिव्यक्ती होईल !' अशी शंका घेऊन 'तसा नियम नाहीं,' याविषयीं दृष्टान्त सांगतात -

गंधरूपरसस्पर्शेष्वपि सत्सु यथा पृथक् ।
एकाक्षेणैक एवार्थो गृह्यते नेतरस्तथा ॥७५

अन्वयार्थ - [यथा गंध-रूप-रस-स्पर्शेषु सत्सु अपि-] जसे एखाद्या फळांत गंध, रूप, रस व स्पर्श हे चारी गुण जरी असले तरी [एकाक्षेण एकः एव अर्थः पृथक् गृह्यते न इतरः] घ्राणादि एकेका इंद्रियानें त्यांतील एकेका गुणाचेंच ग्रहण होतें, दुसऱ्याचें होत नाहीं. [तथा चितः एव अनुवर्तनम्-] त्याप्रमाणेंच वृत्तींमध्यें आत्म्याच्या चैतन्याचीच अनुवृत्ति होते, सुखाची होत नाहीं.

-'पण हा दृष्टान्त व दार्ष्टान्तिक यांचें साम्य नाहीं,' अशी शंका-

चिदानंदौ नैव भिन्नौ गंधाद्यास्तु विलक्षणाः ।
इति चेत्तदभेदोऽपि साक्षिण्यन्यत्र वा वद ॥७६

अन्वयार्थ - [चिदानन्दौ भिन्नौ न एव-] चैतन्य व आनंद भिन्न नाहींतच [गंधाद्याः तु विलक्षणाः इति चेत्-] पण गंधादिक गुण परस्पर भिन्नविलक्षण आहेत, असें जर म्हणशील, तर [तदभेदः अपि साक्षिणि वा अन्यत्र वद-] चिद् व आनंद यांचा

अभेद ऐक्य आत्मस्वरूपांत आहे कीं तदुपाधिभूत वृत्तींमध्यें आहे ? सांग.

प्रकाश:- चैतन्य व आनंद यांचें जसें ऐक्य आहे, तसें गंधादि गुणांचें नाहीं. आणि त्यामुळें तुमचा गंधादिकांचा दृष्टांत बरोबर लागू पडत नाहीं. ही वाद्यांची शंका ऐकून सिद्धान्ती त्यास विचारतात, कीं आनंद व चैतन्य यांचें ऐक्य आहे असें जें तूं म्हणतोस तें स्वाभाविक आहे कीं औपाधिक (उपाधीमुळें होणारें) आहे ? सांग पाहूं. म्हणजे साक्षी जो आत्मा त्याच्या स्वरूपभूत असें तें ऐक्य आहे, कीं वृत्तीमध्यें राहणारें आहे ? ॥७६॥

- यांतील पहिल्या पक्षीं दृष्टान्त व दार्ष्टान्तिक यांचें साम्य आहे, असें सांगतात --

आद्ये गंधादयोऽप्येवमभिन्ना: पुष्पवर्तिन: ।
अक्षभेदेन तद्भेदे वृत्तिभेदात्तयोर्भिदा ॥७७

अन्वयार्थ - [आद्ये पुष्पवर्तिन: गंधादय: अपि एवं अभिन्ना:-] चिद् व आनंद यांचा साक्षीमध्यें भेद नाहीं, हा पहिला पक्ष स्वीकारशील तर पुष्पांत राहणारे गंधादि गुणहि चिदानंदाप्रमाणें परस्पर अभिन्न आहेत. कारण त्यांतील इतरांना सोडून एकाच गुणाला आणतां येत नाहीं. [अक्षभेदेन तद्भेदे सति वृत्तिभेदात् तयो: भिदा-] दुसऱ्या पक्षीं म्ह० गंधादिकांचें ग्रहण करणाऱ्या घ्राणादि इंद्रियांच्या भेदामुळें गंधादिकांचा भेद होतो असे म्हटलें तर त्याचप्रमाणें चिद् व आनंद यांच्या अभिव्यक्तीला कारण होणाऱ्या राजस-सात्त्विक वृत्तींच्या भेदामुळें चिद् व आनंद यांचाहि भेद होईल !

प्रकाश:- चैतन्य व आनंद यांचें ऐक्य आत्म्याच्या स्वभावभूत आहे असें जर म्हटलेंस, तर पुष्पादि पदार्थांवरील गंध, रूप इत्यादि पदार्थांचेंहि तसेंच स्वाभाविक ऐक्य असतें असें समज. कारण मालती, गुलाब इत्यादि पुष्पांतील गंध, रूप, रस व स्पर्श भिन्न भिन्न आहेत असें कोणालाहि दाखविता येणार नाहीं. मोगऱ्यांच्या फुलांतील नुस्ता गंधच आण असें जर 'ते भिन्न आहेत' असें मानणाऱ्या तार्किकांस सांगितलें तर तें अनेक जन्मांतहि त्यांच्या हातून घडणार नाहीं. आतां, गंधादि गुण पुष्पांशी जरी ऐक्य पावलेले असले, म्हणजे ते जरी त्याचे स्वाभाविक धर्म असले, व त्यामुळें भिन्न भिन्न नसले तरी घ्राणादि इंद्रियांमुळें त्यांचा जसा औपाधिक भेद भासतो, तसा या आनंदादिकांचा भासत नाहीं; असें जर म्हणशील तर राजस, तामस इत्यादि वृत्तींच्या भेदामुळें आनंद व चैतन्य यांचाहि भेद होतो असें आम्ही म्हणतों. ॥७७॥

- तर मग सुख व चैतन्य यांचें ऐक्य कोठें उपलब्ध होते व सुखाचें अभान केव्हां होतें, ते सांगतात-

सत्त्ववृत्तौ चित्सुखैक्यं तद्वृत्तेर्निर्मलत्वत: ।
रजोवृत्तेस्तु मालिन्यात्सुखांशोऽत्र तिरस्कृत: ॥७८

अन्वयार्थ - [सत्त्ववृत्तौ चित्सुखैक्यं भासते-] शुभकर्मानें उपस्थित केलेल्या सत्त्वगुणपरिणामरूप बुद्धिवृत्तींत चिदानंदांचें ऐक्य भासतें. त्याविषयीं उपपत्ति- [तद्वृते: निर्मलत्वत:-] कारण त्या वृत्तीला निर्मलत्व आहे. मग त्यांचा भेद कां भासतो ? उत्तर - [तु रजोवृत्ति: मालिन्यात् अत्र सुखांश: तिरस्कृत: भवति-] पण रजोवृत्तीला मालिन्य असल्यामुळें तिच्यामध्यें सुखांश तिरस्कृत-प्रतिबद्ध होतो.

प्रकाश:- शुभकर्मामुळें उत्पन्न झालेली सात्त्विक वृत्ति अति निर्मल असल्यामुळें तिच्यामध्यें चैतन्य व आनंद या दोन्ही प्रकारच्या आत्मरूपाचें भान होतें. पण राजस वृत्ति मलिन असल्यामुळें तिच्यामध्यें आनंदाचें भान होत नाहीं. केवळ चैतन्याचेंच भान होतें. ॥७८॥

-विद्यमान असलेल्याहि सुखांशाचा तिरस्कार कसा होतो, त्याविषयीं दृष्टान्त -

तिंतिणीफलमत्यम्लं लवणेन युतं यदा ।
तदाम्लस्य तिरस्कारादीषदम्लं यथा तथा ॥७९

अन्वयार्थ - [तिंतिणीफलं अति-अम्लं वर्तते-] चिंच अतिशय आंबट असते. [तत् यदा लवणेन युतं तदा अम्लस्य तिरस्कारात् यथा इषत् अम्लं भवति-] पण तिला मीठ लावलें असतां ती कमी आंबट लागते, मीठाच्या संसर्गानें तिचा आंबटपणा तिरस्कृत-गुप्त होतो [तथा आनंदस्य तिरस्कार: भवति-] त्याप्रमाणें आत्म्याच्या आनंदाचा राजस वृत्तींत लोप होतो.

प्रकाश:- मिठाच्या संसर्गामुळें चिंचेच्या आंबटपणाचा जसा बहुतेक लोप होतो, त्याप्रमाणें राजसवृत्तींच्या संसर्गामुळें आत्म्याच्या स्वरूपभूत आनंदाचा प्राय: लोप होतो: ॥७९॥

- पुन: सहेतुक शंका घेतात --

ननु प्रियतमत्वेन परमानंदतात्मनि ।
विवेक्तुं शक्यतामेवं विना योगेन किं भवेत् ॥८०

अन्वयार्थ - [ननु एवं प्रियतमत्वेन आत्मनि परमानंदता विवेक्तुं शक्यतां-] 'अहोपण, वर सांगितलेल्या प्रकारें परप्रेमास्पदत्व या हेतूनें आत्म्यांतील परमानंदतेचा विवेक करितां येणें म्ह० गौण व मिथ्या आत्मरूप प्रिय, उपेक्ष्य व द्वेष्य अनात्म पदार्थांहून पृथक्त्वानें जाणतां येणें शक्य असो. पण हा विवेक मुक्तीचें साधन नव्हे; [योगेन विना किं भवेत्-] योगावांचून काय होणार ?'

प्रकाश:- तुम्ही एवढा वेळ सांगितल्याप्रमाणे "आत्मा अति प्रिय असल्यामुळें तो परमानंदरूप आहे" असें विवेकपूर्वक ज्ञान होणें जरी शक्य असलें तरी तें ज्ञान मुक्तीच्या उपयोगीं नाहीं. कारण योगाभ्यासानें आत्मसाक्षात्कार झाल्यावांचून मुक्ति मिळत नाहीं. असा शास्त्रसिद्धांत आहे. असा या शंकेचा तात्पर्यार्थ आहे. ॥८०॥

-आतां या शंकेचें समाधान करितात --

यद्योगेन तदेवेति वदामो ज्ञानसिद्धये ।
योग: प्रोक्तो विवेकेन ज्ञानं किं नोपजायते ॥८१

अन्वयार्थ - [यत् योगेन तत् एव इति वदाम:-] जें योगानें होणार तेंच विचारानें, असें आम्ही म्हणतों; [ज्ञानसिद्धये योग: प्रोक्त:-] ज्ञानसिद्ध्यर्थ योग सांगितलेला आहे, [विवेकेन ज्ञानं न उपजायते किम्-] आणि विवेकानें ज्ञान उत्पन्न नाहीं का होत ?

प्रकाश:- योग हा आत्मसाक्षात्कारास कारण आहे हें खरें, पण त्यामुळें विवेक हा आत्मसाक्षात्कारास कारण होतच नाहीं असें म्हणणें सयुक्तिक नव्हे. अर्थात् पूर्व श्लोकांत योगावांचून नुस्त्या विवेकानें काय होणार ? असा जो प्रश्न केला होता, त्याचें उत्तर असें कीं जें फल योगामुळें मिळण्यासारखें आहे, तेंच विवेकामुळेंहि मिळतें. ॥८१॥

-याविषयीं प्रमाण --

यत्सांख्यै: प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ।
इति स्मृतं फलैकत्वं योगिनां च विवेकिनाम् ॥८२

अन्वयार्थ - [यत् स्थानं सांख्यै: प्राप्यते तत् योगै: अपि गम्यते-] 'जें स्थान आत्मानात्म-विवेक्यांकडून संपादन केलें जातें तेंच योग्यांकडूनहि मिळविलें जातें.' [इति योगिनां विवेकिनां च फलैकत्वं स्मृतम्-] असें योगी व विवेकी यांस एकच फल सांगितलें आहे.

प्रकाश:- भगवद्गीतेच्या पांचव्या अध्यायांत या श्लोकाचा पूर्वार्ध आहे. व योगी आणि विवेकी यांस एकच फल मिळतें, असा त्याचा सर्वसंमत अर्थ आहे. गीतेच्या अद्वैतपंथी टीकाकारांनीं योग म्हणजे निष्काम कर्म व सांख्य म्हणजे विवेक असा अर्थ केला आहे. पण प्रस्तुत स्थळीं योग शब्दाचा चित्तवृत्तिनिरोधरूप पातंजल योग असा जरी अर्थ केला, तरी तो आम्हांस इष्टच आहे, असें सुचविलें आहे. ॥८२॥

-'विवेक व योग यांचें जर एकच फल आहे तर

शास्त्रांत त्यांतील एकाचेंच प्रतिपादन करणें उचित आहे, दोहोंचें नाहीं' अशी शंका घेऊन 'अधिकारी भिन्न भिन्न असल्यामुळें दोहोंचें प्रतिपादन युक्त आहे' असें सांगतात --

असाध्यः कस्यचिद्योगः कस्यचिज्ज्ञाननिश्चयः ।
इत्थं विचार्य मार्गौ द्वौ जगाद परमेश्वरः ॥८३

अन्वयार्थ - [कस्यचित् योगः असाध्यः कस्यचित् ज्ञाननिश्चयः असाध्यः-] कोणाला योग असाध्य असतो, तर कोणाला ज्ञानाचा निश्चय असाध्य असतो; [इत्थं विचार्य परमेश्वरः द्वौ मार्गौ जगाद-] असा विचार करून परमेश्वर दोन मार्ग सांगता झाला.

प्रकाशः- प्रस्तुत वाक्य योगवासिष्ठांतील आहे. सर्व प्राणी सारखे अधिकारी नसतात. कोणास योग साध्य होण्यासारखा असतो व कोणास विवेकद्वारा ज्ञानच त्वरित संपादन करितां येतें. ही सत्य स्थिति लक्षांत आणूनच ईश्वरानें योग व विवेक हे दोन्ही अधिकारानुरूप सांगितले आहेत. खरें पाहिलें असतां हे उपाय सामान्य ज्ञानाच्या कांहीं उपयोगी नाहींत. पण हें प्रकरणच विशिष्ट अधिकाऱ्यांकरिता असल्यामुळें त्यांच्या करितां सांगितलेल्या उपायांचाच येथें विचार केला आहे, असें समजावें ॥८३॥

- 'अहोपण अत्यंत आयासानें साध्य होणाऱ्या योगामध्यें अनायासानें साध्य होणाऱ्या विवेकाहून कांहीं तरी विशेष असला पाहिजे,' अशी शंका घेऊन 'तो विशेष अपरोक्ष ज्ञानाला उत्पन्न केल्यामुळें आहे कीं योग राग-द्वेषांची निवृत्ति करतो म्हणून आहे, कीं त्यामुळें द्वैताची उपलब्धि होत नाहीं, म्हणून आहे ?' असा विकल्प करून पहिल्या पक्षीं फलाचें साम्य सांगतात -

योगे कोऽतिशायस्तेऽत्र ज्ञानमुक्तं समं द्वयोः ।
रागद्वेषाभावश्च तुल्यो योगिविवेकिनोः ॥८४

अन्वयार्थ - [ते योगे कः अतिशयः-] तुझ्या समजुतीनें तरी योगामध्यें कोणता अतिशय आहे? [योगिविवेकिनोः द्वयोः अत्र ज्ञान समं उक्तं-] योगी व विवेकी या दोघांनाहि योग व विवेक यांचें ज्ञानरूप फल 'यत्सांख्यै०' या वचनानें एकसारखेंच सांगितलें आहे. [च रागद्वेषाद्यभावः तुल्यः-] व रागद्वेषादिकांचा अभावहि एकसारखाच आहे.

प्रकाशः- यासंबंधाने आमचें म्हणणें आहे तें तूर्त असूं दे. पण तुझ्या मताप्रमाणें तरी तूं योगामध्यें कोणता अतिशय पाहातोस ? आम्हांस वाटतें. तुला याचें उत्तर देतां येणार नाहीं. कारण 'यत् सांख्यैः' इत्यादि ८२ व्या श्लोकांत आम्ही विवेकी व योगी यांना ज्ञानरूपी लाभ सारखाच होतो असें सांगितलें. शिवाय राग, द्वेष, लोभ, इत्यादि ज्ञानप्रतिबंधक दोष दोघांसहि सारखेच अनिष्ट आहेत. सारांश, अति आयासानें प्राप्त होणाऱ्या योगामध्यें आम्हांला तर कांहीं अतिशय दिसत नाहीं. अतिशय म्हणजे अधिकता. ॥८४॥

-विवेकी पुरुषाला रागादिक कसे नसतात, तें सांगतात -

न प्रीतिर्विषयेष्वस्ति प्रेयानात्मेति जानतः ।
कुतो रागः कुतो द्वेषः प्रातिकूल्यमपश्यतः ॥८५

अन्वयार्थ - [आत्मा प्रेयान् इति जानतः विषयेषु प्रीतिः न अस्ति-] आत्मा अति प्रिय आहे. असें निश्चयपूर्वक जाणणाऱ्या पुरुषाची विषयांच्या ठिकाणीं प्रीति नसते. त्यामुळें त्यांविषयीं आसक्तिहि असत नाहीं. कारण आसक्तीचें निमित्त जें - आनुकूल्यज्ञान- त्याचाच त्याच्या ठिकाणीं अभाव असतो. [कुतः रागः-] तेव्हां राग प्रेम कोठून असणार? [प्रातिकूल्यं अपश्यतः च कुतः द्वेषः-] व प्रतिकूलता न पाहणाऱ्या पुरुषाला द्वेष कोठून असणार ?

प्रकाशः- विवेकी पुरुष साक्षी कूटस्थच अति प्रिय आहे असें जाणत असतो. त्यामुळें अनात्मरूप विषय त्याला प्रिय वाटत नाहींत. विषय प्रिय न वाटल्यावर त्याच्याविषयीं प्रीति कशी असणार ? तसेंच अमुक

एक पदार्थ आपणास प्रतिकूल आहे असें वाटल्यावरच त्याच्याविषयीं द्वेष वाटत असतो. पण या विवेक्यानें सर्वत्र आत्म्याचें अनुसंधान केल्यामुळें त्याला प्रतिकूल असें कांहींच वाटत नाहीं म्हणून त्याचा कोणाशीं द्वेषहि नसतो. ॥८५॥

-'अहोपण, व्यवहारांत देहादिकांस कोणी पीडा देऊं लागल्यास त्याच्याविषयीं विवेक्याच्या मनांतहि द्वेष उद्भवतो ?' उत्तर -

देहादेः प्रतिकूलेषु द्वेषस्तुल्यो द्वयोरपि ।
द्वेषं कुर्वन्न योगी चेदविवेक्यपि तादृशः ॥८६

अन्वयार्थ - [द्वयोः अपि देहादेः प्रतिकूलेषु द्वेषः तुल्यः-] विवेक्याप्रमाणें योग्याचाहि देहादि प्रतिकूल पदार्थाविषयीं द्वेष एकसारखाच असतो. [द्वेषं कुर्वन् योगी न इति चेत् तादृशः अविवेकी अपि-] द्वेष करणारा योगीच नव्हे, असें जर म्हणशील, तर द्वेष करणारा विवेकीहि नव्हे.

प्रकाश:- कोणी योगी असो किंवा विवेकी असो, देहाला पीडा करणाऱ्या प्राण्याविषयीं त्याच्या मनांत द्वेष वाटणारच. विंचू, सर्प इत्यादि प्राण्यांचा विवेकीच द्वेष करितो व योगी करीत नाहीं, असें नाहीं. आतां असा जो द्वेषी आहे तो खरा योगीच नव्हे, असें जर म्हणशील तर द्वेष करणाराहि विवेकी नव्हे असें समज. ॥८६॥

-'अहोपण विवेक्याला द्वैतदर्शन होतें, योग्याला होत नाहीं, हा योग्यामध्यें विशेष आहे' अशी आशंका घेऊन सांगतात -

द्वैतस्य प्रतिभानं तु व्यवहारे द्वयोः समम् ।
समाधौ नेति चेत्तद्वन्नाद्वैतत्वविवेकिनः ॥८७

अन्वयार्थ - [व्यवहारे तु द्वैतस्य प्रतिभानं द्वयोः समम्-] व्यवहार कालीं द्वैताचें प्रतिभान दोघांनाहि सारखेंच [समाधौ न इति चेत् तद्वत् अद्वैतत्वविवेकिनः अपि न-] आतां योग्याला समाधीमध्यें द्वैत भासत नाहीं, असें जर म्हणशील तर त्याचप्रमाणें अद्वैततत्वाच्या विवेक्यासहि विवेकसमयीं तें भासत नाहीं.

प्रकाश:- व्यवहारकालीं विवेकी व योगी या दोघांसही द्वैताचें भान, त्यांची इच्छा नसली तरी, होणारच! आतां समाधीमध्यें असलेल्या योग्यास तें होत नाहीं असें जर म्हणशील, तर अद्वैत हेंच परम तत्त्व आहे, असें श्रुतियुक्तींच्या आश्रयानें विवेचन करणाऱ्या विवेक्यासहि त्या वेळीं द्वैत भासत नाहीं. त्यामुळें योग्याप्रमाणें त्याचाहि त्या वेळीं कोणाशीं द्वेष राहात नाहीं. ॥८७॥

-'विवेचनसमयीं विवेक्यास द्वैतभान कसें होत नाहीं, तें आम्ही पुढच्या प्रकरणांत स्पष्ट करणार आहों,' असें सांगतात -

विवक्ष्यते तदस्माभिरद्वैतानंदनामके ।
अध्याये हि तृतीयेऽतः सर्वमप्यतिमंगलम् ॥८८

अन्वयार्थ - [तत् अस्माभिः अद्वैतानंदनामके तृतीये अध्याये विवक्ष्यते-] तें आम्हीं 'अद्वैतानन्द'-नामक तृतीय अध्यायांत सांगणार आहों, [अतः सर्वं अपि अति मंगलम्-] त्यामुळें सर्वहि अतिमंगलरूप होईल.

प्रकाश:- आतां 'द्वैताचें भान होत नसून ज्याला आत्मसाक्षात्कार होतो, तो योगींच होय.' असें जर म्हणत असशील तर तेंहि आम्हांस इष्टच आहे.आम्ही केवल शब्दाकरितां भांडत बसत नाहीं. असें आतां सांगतात :-

-'अहोपण द्वैताच्या अदर्शनास आत्मदर्शनसंपन्न असलेल्या पुरुषाला योगित्वच आहे,' अशी शंका व 'तें आम्हांला इष्टच आहे' असें समाधान -

सदा पश्यन्निजानंदमपश्यन्निखिलं जगत् ।
अर्थाद्योगीति चेत्तर्हि संतुष्टो वर्धतां भवान् ॥८९

अन्वयार्थ - [निजानंदं सदा पश्यन् च अखिलं

जगत् अपश्यन् अर्थात् योगी इति चेत्-] आत्मानंदाचा सदा अनुभव घेणारा व सर्व जगाला न पाहणारा अर्थात् योगीच होय, असें जर म्हणत असशील, [तर्हि भवान् संतुष्टः सन् वर्धताम्-] तर तूं संतुष्ट होऊन तुझी वृद्धि होवो.

प्रकाशः- म्हणजे अद्वैतानंदाचा अनुभव घेणारा व जगास मिथ्या समजणारा असा जो कोणी असेल तो योगीच होय, असें जर तुझें म्हणणें असेल तर तें आम्हांस इष्ट आहे. तुझें कल्याण होवो; तूं तसें खुशाल मान. ॥८९॥

-आतां या दुसऱ्या अध्यायाचें संक्षेपतः तात्पर्य सांगतात -

ब्रह्मानंदाभिधे ग्रंथे मंदानुग्रहसिद्धये ।
द्वितीयाध्याये एतस्मिन्नात्मानंदो विवेचितः ॥९०

अन्वयार्थ - [ब्रह्मानंदाभिधे ग्रंथे एतस्मिन् द्वितीयाध्याये मंदानुग्रहसिद्धये आत्मानंदः विवेचितः] ब्रह्मानन्द संज्ञक ग्रंथांतील या दुसऱ्या अध्यायांत मंदाधिकाऱ्यांवर अनुग्रह करण्याकरितां आत्मानंदाचें विवेचन केलें.

प्रकाशः- पंचदशीच्या या शेवटच्या पांच प्रकरणांस ब्रह्मानंद असें नांव आहे. व त्यांत पांच अध्याय आहेत. त्यांतील हा आत्मानंद संज्ञक दुसरा अध्याय येथें संपूर्ण झाला. मंद अधिकाऱ्यांस आत्मानंदाची प्राप्ति व्हावी हा या प्रकरणाचा उद्देश आहे; अद्वैतवादी कांहीं तरी सांगतात, असें जें कित्येकांस वाटत असतें, व त्यामुळें अद्वैत शास्त्राविषयीं कित्येकांची जी अश्रद्धा होत असते, तिचा या प्रकरणांत निरास केला आहे. ॥९०॥

इति पञ्चदश्यां ब्रह्मानन्दे आत्मानन्दः ॥१२॥